# साहित्यिक कऱ्हाड.

★ ★

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले
कऱ्हाड.

किंमत ८ आणे.

दिली आहे. पुढील प्रकरणांत सन्त-पन्त-पंडिती वाङ्मयाबरोबर अधुनिक साहित्यिकांच्या काव्य-शास्त्र-विनोदाचें समालोचन केलें आहे. रसिक साहित्यिकांची तोंड-ओळख करून देतांना त्या त्या लेखकांच्या लिखाणांतील वेचक उतारे देऊन लेखकानें आपलें रसिकत्व प्रत्ययास आणून दिले आहे असेंच कोणालाही म्हणावे लागेल.

शेवटच्या प्रकरणांत श्री. बाबुरावजनींं एका पुराण ग्रंथास विस्मृतीच्या अंधारांतून उजेडांत आणलें आहे. "कऱ्हाड महात्म्य" या संस्कृत ग्रंथांतील प्रकरणांतून वेचक उतारे देऊन "शितावरून भाताची परीक्षा" या वृत्तीचे जे कोणी रसिक "कऱ्हाड महात्म्याचा" आस्वाद घेऊं इच्छितील त्यांना श्री. बाबुरावजीनीं हें क्षेत्र खुलें करून ठेवलें आहे. किंबहुना ललित लेखकाच्या प्रतिभेला जागृत करून नव साहित्य निर्मितीची बीजें दाखवून दिली आहेत. श्री. बाबुरावजीच्या साहित्यिक कामगिरीचें हें एक वैशिष्ट्यच आहे असें म्हटलें तरी चालेल. साहित्य क्षेत्रांत पंडितांचा ते योग्य आदर बाळगतील, बरोबरींच्याशीं खेळाडू वृत्तीनें वागतील व नवशिक्या होतकरूंना मार्गदर्शन करून मानाच्या स्थानावर बसवतील.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभीं चार ओळी लिहिण्याचें धाडस करण्यास श्री. बाबुरावजींच्या वरील वृत्तीचा विश्वासच कारणीभूत झाला आहे. "साहित्यिक कऱ्हाडच्या" वाचकांनीं याच विश्वासानें या पुस्तकाचा आस्वाद घ्यावा अशी विनंति करून हा लेख संपवितों.

बाळकृष्ण वा. घाटे.

# साहित्यिक कऱ्हाड.

## ऐतिहासिक कऱ्हाड.

**कऱ्हाड** ! कऱ्हाड म्हटले कीं चटकन् १७" १७' अक्षांश नि ७४" १६' रेखांश यांच्यावर असलेल्या अेका अतिप्राचीन शहराची याद येते. ख्रिस्तपूर्व प्राचीन शिलालेखातून या शहराचा उल्लेख आढळतो. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या ते दुसऱ्या शतकाच्या काळांत भरूत येथील स्तंभ कऱ्हाडच्या आर्यभूतक, श्यामक, उत्तरगिधिक यांच्या देणगीतून झाले असून कऱ्हाडचे नैगम व्यापारी व बायकाही दानशूर असल्याचा दाखला आहे. त्यावेळीं कऱ्हाड हे लोखंडाच्या व्यापाराविषयीं महशूर असून ' महिक ' प्रसिद्ध व्यापारी असल्याचा उल्लेख ' कुड्याच्या लेण्यांत ' आहे. महाभारतात कऱ्हाडचा उल्लेख ' करहाटक ' असा आला असून " कोयनाकांठचे मोठे बाजार गांव " असा त्याचा अर्थ आहे. दंडकारण्याचा भेद करून तेथें आर्यांची वसाहत करण्याचा प्रयत्न जमदग्निपुत्र परशुराम याने करण्यापूर्वींपासूनच कऱ्हाड वगैरे भागांत राज्ये होती. " कऱ्हाड होणार होते काशी । पण रेणुका झाली विटाळशी ॥" या प्रचलित म्हणीवरून आर्यांनी दंडकारण्यांत प्रवेश केला तरी बरोबरीच्या जनानखान्यासह कऱ्हाडवर चाल करून जाणे अवघड झाल्याकारणानें राजसूय यज्ञाच्या वेळीं पंचम पांडव सहदेव यानें स्वारी करीपर्यंत

१३५० गुरुवारातींल मौलालीचा दर्गा बांधला.

१३९१ बी फातिमाचा पंजा आणि बलखंडी फकिराची कबर असलेला गुरुवार पेठेतील नबीसाहेबांचा दर्गा तयार झाला.

१५७२-७५ अिब्राहिम कमालखान पठाण यानें गुरुवारांतील जुम्मा मशीद आणि तीमधील ७२ हात वा १०६ फूट उंच असलेले व वर्तुळाकार जिन्याचे शेवटच्या तिसऱ्या खिडकीतून सातारच्या किल्ल्याचा तट दाखविणारे मनोरे विजापूरच्या अल्ली अदीलशहाच्या (१५५७ ते १५८०) कारकार्दीत बांधले.

१६३७ निजामशाही मोंगलांच्या ताब्यांत देवून शहाजी विजापूरकरांचा सरदार झाल्यामुळें त्यास महंमद अदिलशहाकडून देशमुखी मिळाली.

१६'१३ देशमुखी बाजी घोरपड्याकडे गेली.

१६५७ काशीपंत ऊर्फ घानतराव देशपांड्यास विजापूरकडून महजर मिळाला.

१६५९ अफझलखानाचा वडील मुलगा फाजलखान व बायकामाणसें यास पैशाच्या लालचीने आडमार्गे सुरक्षित पोचविणारा तर्फ उन्नर्तांचा देशमुख खंडोजी बिन् धर्मोजी काकडे (खोपडे) शिवाजीच्या भितीनें एक महिनाभर जुम्मामशिदीत दडून होता.

१६६१ शिवाजीस चेचण्यासाठीं अल्ली अदिलशहाची मोठे सैन्य घेऊन स्वारी.

१६७२-७३ पिलदेव रामनामे (रामरामी, हे कुलकर्णी म्हणून आले.

१६७७ बुवाशा बाजीद तक्या बाजीदबुवानी बांधला.

१६८० सेनापति हंबीरराव मोहिते यास संभाजीनें आपणाकडे वळविले.

१७०२ देशगावडे धनगरांनीं ( कोर्ट व मुस्लीम बोर्डिंग जवळील ) बिरोबाचे देऊळ बांधले.

१७२७ रंगार वेसेजवळ २४९ फूट लांब व ७८ फूट रुंद असा घाट गावकऱ्यांनीं कोयनेस बांधला. शिवाजीराव डुबलानी ( बहिरोबाचे आळीचे ) उत्तरा लक्ष्मीचे देवालय बांधले. गिजेर यांनीं बहिरव मंदिर तयार केले; उमराणी मंडळीनीं हटकेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. पंतप्रतिनिधींनीं संगमेश्वर मंदिर दुरुस्त केले.

१७३१ सातारकर शाहू व करवीरकर संभाजी यांची जखिणवाडीच्या शिवेवर भेट.

१७३७ श्रीकर हाटकेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार शिवाजीराव डुबलांनी केला.

१७३९ सर देशमुखानी रत्नेश्वर मंदिर बांधले; परशुराम नाईक अनगळानी कमळेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला.

१८१३ गणेश देवानी बहिरव आळीचा गणपति आणि नरहरी याची देवालये स्थापन केली.

१८२२ बाबाजी नारायण कुलकर्णी यांनीं कोटाखालील गणपति स्थापला.

१८२७ काले येथील गोपाळ माणकेश्वर कुलकर्णी यांनीं मंगळवारातील ज्योतिबाचे देऊळ व दाजीबा वारुंजकरानी मोकाशी राममंदिर बांधले.

१८३३ पंतप्रतिनिधीनी काशीविश्वेश्वर स्थापला आणि श्यामजी व्यंकटेश काळे यांनीं 'जोशी' राममंदिरापासून कृष्णामंदिरासमोरपर्यंत ३०९ फूट लांब व २४ फूट रुंद असा घाट बांधला.

१८३८ बहिरवपंत गिजऱ्यानी गवळ वेशीस ६० फूट लांब व ४८ फूट रुंद असा नि वेणाआी तुळसणकरणीने नाथाचे देऊळ व २४ फूट लांब आणि ३६ फूट रुंद असा घाट कृष्णेस बांधला. तर कृष्णा प्रवाहाचे पलिकडे सैदापूरचे बाजूस वाळवंटात वीर मारुतीचे देवालय राघोपंत आपट्यानी बांधले. तसेच डुबलानी आपल्या घराजवळ मारुती व महादेव बुवा चिवटयानी शुक्रवारातील कुलकर्ण्यांच्या घरासमोरील राम स्थापला.

१८४४ श्यामजी व्यंकटेश काळयानी सोमवारात तुकाआी (आंबाबाआी) चे देऊळ बांधले (२) दोनशे वर्षांत बसला नव्हता एवढा नुकसानीचा धक्का कृष्णापुराने दिला.

१८४७ भवानदीन परदेशीने शनिवारातील महादेव, गणपति व मारुतीची देवळे बांधली तर नारायण दाजी देशपांडे कोळे-

वाईकर यांनीं आपले वडिलांची समाधि कृष्णाघाटावर बांधली. (२) गोपाळेश्वरापुढें परिपूर्णानंद स्वामींनीं समाधि (प्रतिनिधी बागेत) घेतली.

१८५३ कृष्णेस महापूर येऊन श्रीकृष्णाबाई उत्सवाचा रथ वाहून गेला.

१८५४ लोकशिक्षणासाठीं मध्यवर्ती व नमुनेदार प्राथमिक शाळा ता. १ आगष्ट रोजीं स्थापन झाली.

१८५५ म्युनिसिपालिटी आली. (२) शाहू महाराजांचे कारकीर्दीपासून पंतप्रतिनिधींची ही राजधानी ब्रिटिशाकडे मोबदला.

१८५९ संकेश्वर पीठाधिष्ठित नरसिंह भारती ( अप्पादा॥ कऱ्हाडकर समाधिस्थ झाले.

१८६४ सार्वजनिक दवाखाना सुरू.

१८६८ कोयनापुलाचे काम सुरू.

१८७१ सार्वजनिक सभेची स्थापना.

१८७२ कोयना पूल चालू.

१८७५ वक्तृत्वोत्तेजक सभेची स्थापना. (२) कृष्णा पुराने भुईकोट किल्ल्याच्या तटास धक्का.

१८९१ गायरानाच्या जप्तीबद्दल दाद मागण्यासाठीं शेतकऱ्यांची झुंड कलेक्टरच्या बंगल्यावर.

१८९६ दुष्काळामुळें गांजलेल्यास मदत देण्यासाठीं हसन मुंजावरप्रभृतींनी केलेली पेठेची लूट.

१९०६ लोकमान्य टिळक व आण्णासाहेब परांजपे यांची कोटाखालील धर्मशाळेत स्वदेशीवर व्याख्यानें.

१९०८ दे. भाऊसाहेब भागवत यांचा मृत्यु.

१९०९ मॅच फॅक्टरीची स्थापना.

१९१० अंगापूरकर प्रभृतींना स्वदेशी चळवळीबद्दल सरकारी प्रायश्चित्त

१९११ गोरक्षण संस्थेची स्थापना.

१९१२ दे. केळकरांचे अध्यक्षतेखालीं जिल्हासभा.

१९१४ गांव-तालुका-जिल्हा-सभामार्फत कॉंग्रेसचें काम चालावें म्हणून आप्पासाहेब आळतेकर खटपटीसाठीं मद्रासेस रवाना. (२) गांवातूनही नावेनें ये जा करावयास लावणारा कृष्णेचा पूर.

१९१७ कोयनेला वॉटर वर्क्स होऊन गांवांत नळाचे पाणी सुरू. (२) अर्बन बँकेची स्थापना.

१९१८ दे. काकासाहेब खाडीलकरांचे अध्यक्षतेखालीं मॉन्टफोर्ड सुधारणांच्या विचारासाठीं भरलेली जादा जिल्हा सभा.

१९२० म. गांधी-अल्लीबंधूचा दौरा.

१९२१ टिळक हायस्कूलची स्थापना. (२) मुळशी सत्याग्रहांत मारुलकर वकील.

१९२३ नेमस्तांची प्रांतिक परिषद.

१९२७ महात्मा गांधी व राष्ट्रसभापति श्रीनिवास अय्यंगार यांचा दौरा. (२) त्रिशतसांवत्सरिक शिवोत्सव.

१९२८ तुकडेपट्टी बिलाचा सार्वत्रिक निषेध व आमदार लक्ष्मण महादेव देशपांडे यांचा दौरा. (२) कराड तालुक्यांत प्रथमच खेडोपाडी बाबुराव गोखले कॉंग्रेसचा प्रचार करतात.

१९२९ लिंब येथें जिल्हा सभेचे अध्यक्ष दे. शिराळकर.

१९३० नवीन जन्मतिथीप्रमाणें त्रिशतसांवत्सरिक शिवोत्सव.(२)मुंबई च्या सत्याग्रहीवरील लाठीमाराच्या निषेधार्थ आमदार देशपांड्यांनीं आमदारीचा राजिनामा दिला. (३) कायदेभंगाच्या चळवळींत ना. गव्हर्नरसाहेबांचे काळ्या निशाणांनीं स्वागत.

१९३२ हजेरीच्या नोटीसा व काँग्रेसच्या इज्जतीसाठीं त्यांचा भंग. (२) अभ्युदयास ' तरुणांची तंद्री ' या लेखाबद्दल नोटीस. (३) डॉ. हेडगेवार व दे. बाबासाहेब सावरकर यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्थापनेसाठीं आगमन.

१९३३ अखिल भारतीय सनातन धर्मीयांच्या वर्णाश्रमस्वराज्य-संघातर्फे विलायतेला शिष्टमंडळांतून श्री. नानासाहेब देशपांडे.

१९३५ काँग्रेस महोत्सव व ब्रिटिश रियासतीतील सातारा जिल्ह्याचा श्री. पु. पां. गोखले यांनी लिहिलेला राजकीय इतिहास " जागृत सातारा " प्रसिद्ध.

१९३६ दानशूर पांडुअण्णा शिराळकर यांची षष्ठ्यब्दि. (२) महाराष्ट्र इन्शुअरन्स क. ची स्थापना. (३) शिराळकर-गीता-ट्रस्ट व तीस हजारांचा लोकसेवा-निधी. (४) घाटे आळीचे जैन मंदिर तयार झाले.

१९३७ डॉ. हेडगेवार, जवाहरलाल नेहरू, नि बाळासाहेब खेर यांचे दौरे. (२) काँग्रेसतर्फे दे. पांडुआण्णा मुंबई विधिमंडळांत. (३) वीरशैव लिंगायत परिषद. (४) बाबुराव गोखले लोकसेवा संघाचे कार्य सुरू करतात.

१९३८ सातारा प्रांतीय वैद्य-हकीम-परिषद.(२) दे.आप्पासाहेब आळतेकर यांचा मृत्यु. (३) जमीन मालक संघाचा दे. शिराळकरावर

मोर्चा. (४) जिल्हा शेतकऱ्यांचा कुळ कायद्यास पाठिंबा.

१९३९ कृष्णा घाटावरील ताबूत मिरवणुकीचा वाद. (२) कृष्णा कनाल बागाईतदार संघाचे बुर्ली परिषदेस बाबुराव गोखले अध्यक्ष. (३) कृष्णा नदीवर पात्रापासून ४५ फूट उंच असा १४ कमानींचा ९०० फूट लांब व ४७१ हजार रुपये किंमतीचा पूल.

१९४० 'कोल्हापूर ही आजची नरकपुरी' म्हणून से. बापटांचे व्याख्यान, (२) परिचित सातारा प्रसिद्ध, (३) वॉडिन इन्शुअरन्स कंपनीची १९३९ ची अखिल भारतीय ट्रॉफी मे. सरडे आणि घाटगे यांनीं मिळविली, (४) राजकीय परिस्थितीसाठीं गोखले यांचा लोकसेवासंघास रामराम, (५) जिल्हा हिंदुमहासभा-सम्मेलन नि आमदार शिवरामपन्त करंदीकर यांचे व्याख्यान, (६) जिल्हाधिकाऱ्यास सभा-रपोटाविषयी गोखले यांचे पत्र, (७) युद्धसहाय्यासाठीं कुस्त्यांच्या फडास ना. गव्हर्नरसाहेबांची भेट, (८) म्युनि-सिपालिटी सरकारजमा.

१९४१ मिरजेचे दे. बाळकृष्णपन्त शिखरे व वालचंद गांधी यांचा गांधीप्रणित युद्धविरोधी सत्याग्रह, (२) अर्ध्या शतकाच्या गाळांतून कृष्णाघाट मोकळा, (३) दक्षिण महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे तिसरें अधिवेशन............

कऱ्हाडच्या आजपर्यंतच्या जीवनांतील ठळक गोष्टींचे विमान-भरारीनें केलेलें हे निरीक्षण मनाला एक तऱ्हेची चुटपुट लावून

सोडते. या क्षेत्रांतील निमजग्याच्या माळावर आजही २२८ फूट लांब व ९० फूट रुंद असलेला उत्तरालक्ष्मीच्या जुन्या देवळाचा चौथर आपल्यावरील भव्य मंदिराचे शिखर कृष्णाकोयनांच्या प्रीतिसंगमांत प्रतिबिंबित होत होते या गोष्टीची आठवण देऊन या प्राचीन शहराच्या ऐतिहासिक स्थित्यंतरांचा सूक्ष्म अभ्यास करावयास बुद्धीस आव्हान सादवितो. त्या आव्हानाच्या अनुषंगानें पुराण वस्तुसंशोधन नि संग्राहक खातें १९१४ च्या कैसरी कंदनापूर्वी प्राचीन कऱ्हाडाचे उत्खनन करणार असल्याची वार्ता होती तिची आठवण होते आणि सातारचे धर्मवीर कै. विष्णुपंत करंदीकर म्हणत याप्रमाणें काव्र्याच्या धानाईपर्यंतचा भाग कऱ्हाडांत समाविष्ट असल्याचे चित्र कल्पना रंगवू लागते. पण अनिश्चित भराऱ्यानीं रममाण होण्यापेक्षां सत्यसृष्टीत उतरतांना बुद्धिचा आश्रय मिळताच संगमेश्वर, कृष्णाबाई नि कमळेश्वर या प्राचीन देवस्थानांपैकीं कमळेश्वराच्या देवळात मुक्काम ठोकताना कृष्णा घाटावरून श्रीज्ञानेश्वर चढून आल्याचा उल्लेख जो कोठे कोठे आहे, तो घाट कोठे आहे ? असा ध्यास लागतो नि निराशा पदरांत पडते. तथापि चवदाव्या शतकांत मुसलमानी रियासतीत ‘कलहराबाद वा कल्हार’ म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शहरांत जमून मक्केस जाण्याची वहिवाट मुसलमान यात्रेकरुंची अविच्छिन्न आहे, आणि ते अल्ली अलागरशहाने नेमलेल्या विजापूर दरबारच्या येथील काजी घराण्यास फार मानतातही, त्यामुळेंच मुख्य मशीदीशिवाय ( शनिवारांतील ) सौदागरानें बांधलेला ख्वाजाखिजरचा अथवा खासखदर घुमट, नि काजीवाड्यांतील पीर त्याच प्रमाणें रोडाशा फकिरानें ( शुक्रवारात कवठीखालीं ) बांधलेला जकलीफकीर तक्या कांहीं

नावारूपास आले. कोटांतील १३६ फूट लांब तोंडापैकीं १०० फुटांत ८० पायऱ्यांची ' दुमजली ' इमारतीचा नकट्या रावळ्याचे विहिरीजवळ प्रतिनिधींचा भवानी, गवळवेस—रंगारवेस—मसूरवेस दाभोळ-दरवाजा-ब्राह्मणवेस-बुधवारपेठवेस मंगळवारवेस -गाडीउतारवेस यांचे केवळ नाममात्र अंश, आणि देशमुख-देशपांडे-नाडगौंडा-महाजन डुबल--डबीर--चौधरी--लेंढे पाटील--नि रामनामे कुलकर्णी-काजी. खतीब यांच्या अेकवेळच्या दिमाखदार कर्तबगारीचे वारस हे ऐतिहासिक व सामाजिक अभ्यासासाठीं खात्रीनें नजर वेधतात-

आजकालही शेंगा-गूळ- हळदींच्या वखारीच्या वखारी येथें असून एकंदरीनें व्यापारही जिल्ह्यांत पहिल्या प्रतीचा ह्मणता येण्यासारखा आहे. आसमंतांतील तीन मैलांच्या अंतरावरून आपल्या उभारानें प्रेक्षकांचे डोळे वेधण्याचे काम दोन मनोरे जसे करीत असतात, तसेच कृष्णा-कोयनांचे दोन पूलही करीत असतात. नदीचे प्रवाह पाय न भिजतां ओलांडून जाण्यासाठीं असलेल्या या दोन पुलाप्रमाणें कालप्रवाह ओलांडण्याचें एकही दिमाखदार साधन अजून मानवी आटोक्यांत आल्याचें आढळत नाहीं. या पुलावरून संगमेश्वरापासून खालीं पसरलेल्या अफाट वाळवंटाची आठवण साहजिकच होते आणि मुंबईच्या चौपाटीचेपेक्षा सरस असणारे हे कऱ्हाडचें वैभव आहे याचा अभिमान वाटतो. गांवच्या एका बाजूकडील या अभिमानस्थानाबरोबर निमजग्याच्या माळाचें आजूबाजूस मैल मैल पसरलेली काळीभोर बहुधान्यप्रसवा धरित्री ही एकप्रकारे कऱ्हाडची अन्नपूर्णा आहे या विचारानें समाधन होते. संसाराच्या दगदगीतून

चार घटका मनाला विरंगुळा देण्यासाठीं २ बोलपटगृहें एकप्रकारे शहराच्या दोन बाजूनी प्रयत्न करतात तर जीवनांत कांहीं संगती निर्माण करण्यासाठीं दोन संगीत शाळानी आपल्या तारा छेडण्याचे कार्य सतत चालविलेले असते. मनोरंजनाबरोबर दैनंदिन जीवनाची ओळख देणारी मनोरंजक वाचनालय व सार्वजनिक वाचनालये बुद्धिवादाला जागृत ठेवण्याचे काम करता करता सरस्वतीव्याख्यान-मालेसारख्या उपक्रमाने मधून मधून जीवनतत्वज्ञानाची ओळखहीं करून देत असतात. महाराष्ट्र हायस्कूल नि टिळक हायस्कूल ही कऱ्हाडची ' शाळा ' अेकंदरीने उच्च कशी होईल याच्या फिकिरीत असतात आणि राष्ट्रीय जीवनाशी संबंध जोडण्याकरितां राष्ट्रभाषा-विद्यालय कराडच्या नागरिकांना राष्ट्रभाषेचे शिक्षण देण्याचे कामा-करितां आहे. त्याचप्रमाणें जागतिक जीवन-विचारप्रवाहाशी तारीख-तागायत परिचय करून देऊन ' जग बदलण्याचे ' कार्य करण्या-साठीं ' जगाचा परिचय ' करून देण्याची ज्ञान–पोयी ज्ञानविकास मंदिर व सुधास्मारक–मंदिर या संस्थानी घातली आहे.

## २ पंडिती सन्तपन्त साहित्य —

ज्ञानगंगेच्या कावडी वहाव्या आणि मिळेल ती संभावना स्वीकरून आपलें आधात्मिक नि पंडिती वा पढीक जीवन सार्थपणे व संथपणें कर्तव्यदक्षतेनें काढावें, हे वळण कऱ्हाडच्या सरस्वतीसेव-कांना नवव्या शतकापासून आहे, हें इतिहासाच्या विद्यार्थ्याला सुप-रिचितच आहे. शतका–सव्वाशतकापूर्वीपर्यंत कितीतरी अग्निहोत्री या क्षेत्री होते आणि वेदविद्येच्या अभ्यासानें त्यांनीं आपले व कऱ्हाडचें

नावही दिगंतरी गाजविल्याचे दाखले आहेत. पंचवीस वर्षे फलटण येथें संसार केल्यावर द्वारकेंत विरक्त झालेला आणि एलिचपूरला ' कामाख्येने ' भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला असतां देहांत पतकरणारा तेराव्या शतकाच्या पहिल्या पादातील वेदांतविशारद चक्रपाणी राजनायक हा ब्राह्मण कऱ्हाडकर होता हे सुप्रसिद्ध आहे. मराठ्यांच्या वैभवशाली साम्राज्यांत ग्वाल्हेरीत शिंद्यांचे आश्रयास असलेल्या गोपाळाचार्य अण्णा कऱ्हाडकरांची व्याकरणशास्त्रातील उपस्थिती फार तीव्र आणि इतर शास्त्रातील प्रमेयेही जिभेच्या शेंड्यावर, त्यामुळें पंडितात त्यांचे नांव तिकडे अजूनही कृतज्ञतेने घेण्यांत येते. छत्रपती शाहू महाराजांच्या पदरचे विरक्त पंडित शिरोमणि कृष्णाचार्य या अधिकारी नैय्यायिकाने वज्रकंकटकशास्त्री काशीकर यांच्यावर वादांत विजय मिळवला याचे स्मारकच जणूं छत्रपतींनी आचार्यांना कालगांव इनाम करून देऊन उभारलें आहे.

अशा तऱ्हेच्या पांडित्यपाटवाबरोबर, त्या पांडित्याचा पाट जनतेच्या सेवेसाठीं फोडून त्यांतील जीवन नारिकेलपाकासारखे तरी कारणी लावावे अशांचीहि उदाहरणे कऱ्हाडास कमी नाहींत. प्राचीन स्मृति--पुराण--निबंधादि ग्रंथातील शेंकडो वचने उद्धृत करून प्रत्येक तिथीची स्मृति नि पौराणिक कृत्ये समजावून देणारा ' तिथितत्व ' हा ग्रंथ सन १७४४ मध्यें यज्ञेश्वर नारायण ढवळीकर या कऱ्हाडकरानें रचला, हे कोणास माहीत नाहीं? रामचंद्र दैवज्ञांचे कऱ्हाडकर विद्वान् शिष्य गोविंद बाळकृष्ण दि॥ गरूड ( १७८३ ते १८५४ ) यांनीं मंजुषा, तरंगिणी, कालप्रबोधोदय, एकादशीप्रकाश

या ग्रंथानीं आपले पांडित्यजगाच्या स्वाधीन केले हे कोण विसरेल ? फार काय, सातारकर प्रतापसिंह महाराजांच्या जवळील गुणी पुराणिक आणि नीतिमंजरी, राघवचंपू, राधाविलास, रासार्या, विठ्ठलार्या या ग्रंथांचे जनक गोपाळाचार्या कालगावकरांनीं प्रतापसिंह महाराजासाठीं महा--भारताचा मराठी तर्जुमा अर्धाअधिक उतरला होता, याची आठवण कोण्या मराठीच्या भक्तास उत्साहजनक नाहीं ? वेदांतावरील अधिकारी पुरुष म्हणून इंदोलीकर वामन परशुराम फणसळकर यांची आठवण कोणता कृतज्ञ साहित्यिक विसरेल ?

पांडित्याच्या प्रासादातून वरीलप्रमाणें नमुनेदार विहार जसा कऱ्हाड्या मराठीनें केला, तसाच परमेश्वरी प्रसादासाठीं भक्तीच्या जिव्हाळ्याने संत--शिकवणीचा सोहळाही तिनें अभिमानास्पद विस्तारानेंच थाटला. महाराष्ट्राच्या इतिहासांत प्रभावी, प्रचारी नि प्रथोत्पादक सन्त आढळतात. या सर्वांची वानगी कऱ्हाडास सुदैवानें लाभली आहे. सासूच्या छळामुळें सहनशीलतेचा साक्षात् सह्याद्रि ह्मणून जगास परिचित असलेली संत सखू आपल्या नितान्त विठ्ठल-भक्तीनें महाराष्ट्राच्या वाग्गंगेतून करुणरसाचें कालेंव वाहविण्यास कशी कारणीभूत झाली हे मराठीच्या अभ्यासकास नव्यानें सांगावयास नको. वस्तुतः संतसखूचें साहित्य कोठें उपलब्ध नाहीं. तथापि परंपरेनें चालत आलेला संतसखूच्या नांवावरचा एक अभंग एका तीर्थ-स्वरूप आजीबाईनीं आम्हास सांगितला तो असाः—

धाव देवा, देवा धाव । किति घेऊं विठ्ठल नाव
सासुमाई मारी लाथ । सुटे संसार हातोहात
देवा एकेच आळवणी । तुझे पाय जीवा वणी

इतिहास-संशोधकांनीं नि वाङ्मयचिकित्सकांनीं वरील अभंग प्रक्षिप्त ठरविला तरी तो आम्हांस पुरविणाऱ्या आजीबाईंच्या भोळ्या भक्तीचाही अवमान नाहीं; तथापि प्रभावी संतांपैकीं मानाचें स्थान संत सखूस आहे, एवढे मराठींतील करुण रसाच्या वळणाओहोळां-वरून जसे प्रत्ययाला येते, तसेच भागवताच्या दशम स्कंदावर श्रीधराच्या मागोव्यानें 'हरिवरदा' म्हणून टीका लिहिणारा दत्त-जननोत्सव व विचारचंद्रिका या सर्वश्रुत ग्रंथांचा कर्ता, कोपारूढ (कोपरोंड) चा नरहरि नारायण ऊर्फ कृष्णदयार्णव यानेही कऱ्हाडची कीर्ति कोकणापासून पैठणपर्यंत अठराव्या शतकाच्या प्रथमार्धांत नेली हेही पटते.

" नाहीं वेण न दुखे पोट । नाहीं प्रसूति संकट ।
अद्‌भुत बाल झाले प्रकट । श्रीवैकुंठ निज रूपें ॥
तेणें (वसुदेवें) देखोन अद्‌भुत बाळ । विस्मयें दाटला केवळ ।
उत्फुल्लित नेत्रकमळ । पाहे चंचळ चकितत्वें ॥
अद्‌भुत तेजःपुंज बाळ । स्वप्रकाशे बंदिशाळ ।
धवळी तैसेचि हृदयकमळ । केले सोज्वळ जनकाचें ॥

हे कृष्णदयार्णवकृत कृष्णजन्मवर्णन वाचून हरिवरदा हे मराठींचे लेणे आहे, अशी अभ्यासकाचीही खात्री पटेल. कृष्णदया-र्णवांच्या पेक्षाही प्रभावी नि प्रथोत्पादक संत म्हणून, त्यानी स्वता व शिवदिनकेसरी आणि समर्थ रामदास अशाही समकालीन संतानी ज्यास सत्कारिले, ते काशीराज पैठणकरांचे शिष्य, गाणपत्य-सांप्रदायाचे प्रणेते व गणेशगीतेचे कर्ते यल्हेश्वर नरसिंह पाठक ऊर्फ

निरंजनस्वामी ( १६३७–१७२७ ) यांचे नांव मराठीने आदरणीय मानले, हे कऱ्हाडच्या अंगावर नेहमींच मूठभर मांस चढविणारे नाहीं काय ?

> सुपारीच्या ठाई गणेश पूजीला ।
> देव नाहीं झाला पूगीफल ॥
> सुपारीच्या नावे देवास पूजणे ।
> ऐसे हे वाचेने न बोलावे ॥
> विनायक विश्वरूप दावी लीला ।
> परंतु तयाला जन नेणे ॥
> हेमाचा नागला केला तरी सोने ।
> नाहीं जाले उणे सुवर्ण ते ॥
> सुवर्णासी नागपण नाहीं सत्य ।
> तैसा सर्वातीत निरंजन ॥

अशा अभंग-वाणीनें निरंजनानीं निजामी मुलुखापर्यंत आपला सांप्रदाय विस्तारला आणि मराठीची मान मानानें उंचावला.

प्रचारी संतासंबंधीं विचार मनांत येण्याचा अवकाश, कऱ्हाडशीं निगडित असलेल्या समर्थशिष्या अक्का देशपांड्यांची साहजिकच आठवण होते. रुद्राजीपंत चंद्रोजी देशपांड्यांच्या या कन्येनें परळी येथील समर्थांची समाधि नि सभामंडप बांधला, एवढेंच नव्हे, तर समर्थांच्या पुतण्यास चाफळ येथें आणून छत्तीस वर्षे समर्थ सांप्रदायासाठीं हिनें हाडाची काडे केली. या अबोल नि अमोल उभारणीचे अमोघ साधन जो समर्थांचा 'दासबोध' तो मसूरास 'कल्याण' या

सार्थ आध्यात्मिक नांवानें लोकांच्या डोळ्यांत भरलेल्या व पुढें डोमगांवचा मठपति झालेल्या अंबादास–कृष्णानेच लिहिला नव्हता काय? तथापि प्रचारकार्यांत नव्या दमानें 'आपल्या हातचा' कांहीं घालण्याचे धाडस जगांत कोठें झाले नाहीं? समर्थ सांप्रदायाच्या प्रसारांत कऱ्हाड प्रांतियांनीं तशी धिटाई करतांना जसे लेखक तसेच 'लेखकू' ही निर्माण झाले. सतीबाई शहापूरकरांचा भाचा आणि तंजावर-शहापूर मठांचा महंत भीमस्वामी याने लिहिलेले समर्थचरित्र आणि त्याहीपेक्षां सज्जनगडावर समर्थ-निर्याण प्रसंगीं स्वतः हजर असल्यामुळें त्याने त्या प्रसंगाचे पन्नास ओव्यांत केलेले वर्णन हृदयाचा ठाव घेणारे आहे. त्याच म्हणजे भीमस्वामी याच नावाचा पण शिरगांव मठाचा "कल्याण–पणतू" अधिपति १७९७ मध्यें भक्त–लीलामृत हा ग्रंथ लिहिता झाला; पण त्याच्या अभंगमय ग्रंथातील चौकसपणाच्या अभावी वास्तवभंग होत असल्याकारणानें शहापूरकर भीमस्वामी जसा लेखक ह्मणून तसाच शिरगांवकर लेखकू ह्मणून मराठीच्या अभ्यासकांना सुपरिचित आहे. अशा स्थितींत भक्तमंजरीचा कर्ता आनंदनाथ आणि संतविजय नि हनुमंत स्वामींची बखर यांच्या आधारे १८६७ त समर्थांचे ओवीबद्ध चरित्र लिहिणारा आत्मारामबुवा चरेगांवकर यांची अभिवादनपूर्वक हजेरी लावण्यापलीकडे आम्हांस कांहींच करता येत नाहीं.

प्रचारी संतवांग्मयाच्या विचारानें 'वेडे' होणारे मन प्रचारप्रभावी पंत-वाग्मयाचा विचार डोकावताच वेडावून जाते यात शंकाच नाहीं. कारण संतवांग्मयापेक्षां खरोखर पंतवांग्मयानेच कऱ्हाडचें नांव

ज्ञानेश्वरानंतर “ माझा मराठाचि बोल कौतुकें । अमृतातेंही पैजा जिंकें ॥” अशा जणु प्रतिज्ञेनें महाराष्ट्रभर दुमदुमविले. सुश्लोक–लाघवादि ग्रंथाचे कर्ते आणि आपल्या संस्कृत, प्राकृत नि संत-पंडित समन्वयी मराठी पद्यांनीं ‘ पहिले ते हरिकथानिरूपण ’ महाराष्ट्रभर सुरस चमत्कृति-प्रमोदांनीं प्रफुल्ल आणि वेदांत-व्यवहाराची वक्तृत्वा पूर्ण जोड घाळून सर्वार्थानीं ‘ परमार्थी ’ करून सोडणारे विठोबा अण्णा (बेंद्रे) दप्तरदार (१८१४ ते १८७३) यांचे वांग्मय भावनांचा खळबळाट, बुद्धिचा चमचमाट आणि सात्विक भावांचा लखलखाट असा उंचावते कीं संसाऱ्यांनीं स्थितप्रज्ञ व्हावे आणि स्थितप्रज्ञांनीं संसाराला सरसावावे.

“ कोटि-कोटि-कंदर्प-रूप-लावण्य-दर्प-हर, ध्यान-मनोहर, अनंत-जन्म-मनोमल-पटली-निर्मूलनकर, भक्तिगम्य, तापत्रयभंजन, आसेचनक, ध्यानि पहाता वाटे जणु नयनात भरावे, हुंगावे, दृढ आलिंगावे की चुंबावे, विसरतसे संसार सर्वही संत तयाचा पंत विठ्ठला सहज लागला छंद ॥ हरि हा आनन्दाचा कन्द ॥

या विठोबा आण्णांच्या काव्यपंक्ति सखोल आभ्यासाने वाचण्याचा प्रयत्न करील त्याला शब्दाशब्दाच्या अनुक्रमानें सविकल्प समाधिचाच नुसता नव्हें, तर तन्मयतेचा अनुभव आल्याशिवाय खास राहणार नाहीं. आणि स्वरूपसुंदरतेनें तन्मय झालेला अधुनिक पिसा देखील त्या सुन्दरतेला–

‘ वाटे जणु नयनांत भरावे, हुंगावें, दृढ आलिंगावें, कीं चुंबावे, विसरतसे संसार सर्वही ’ यापेक्षा दुसऱ्या कशाची इच्छा

करील ? आणि ह्मणूनच पंडितवांग्मयाची परंपरा राखणारे, संतवां-ग्मयाचा ओलावा ओथंबविणारे, आणि रसा-रसांचा प्रीतीसंगम साधून आरोहावरोहानीं कानाला, सूक्ष्मतेने ध्यानाला आणि नाजूक संवेदनानीं भानाला हरपवून सोडणारे पंत-वांग्मय नुसते दफ्तरात ठेवण्याच्या लायकीचे न ठरतां कऱ्हाडची तरफदारी आसेतुहिमाचल करण्याचा विक्रम गाजवून बसले. अभ्यासकांनीं ते हृदयाशीं धरावे आणि त्याचे उज्वल वारसदारांनीं मराठीच्या नगरी प्रतिभाविलासानीं ओसंडून सोडाव्या ह्मणजे ब्रह्मविद्येचा नसला तरी रसोत्कर्षाचा सुकाळ मराठीला कधीच पारखा होणार नाहीं.

## काव्य-शास्त्र-विनोद.

नवविधा भक्तिपैकीं लोकसंग्रहक कीर्तन-भक्तिला वाहिलेली कऱ्हाडचीं दोन घराणी म्हणजे सोमवारांतील देव व शुक्रवारांतील श्रोत्री होत. त्यांच्या प्रस्तुत पिढ्यांतून हा सांप्रदाय दृगोचर होत नसला तरी भागवतबुवांच्या व मारुतीबुवांच्या मठांतून जसा निरुपणी कीर्तनांचा सांप्रदाय अखंड विठ्ठलनामाचा गजर करीत राहिला आहे, तसाच त्याही घराण्यांनीं एक वेळ वेदांत-व्यवहारी कीर्तनसांप्रदाय उंचावला होता यांत शंका नाहीं. मात्र, जीवाशिवाच्या संबंधांत शिवासंबंधी जीवाचे कर्तव्य सांगणारा पूर्वरंग आणि ‘सगुणचरित्रें, परम पवित्रे सादर वर्णणारे’ आख्यान ही कीर्तनाची दोनही अंगें विठोबाआण्णा दप्तरदारांच्या खानदानी वांग्मयानें भरदार चमकली आणि आपल्या मांडणीच्या पद्धतीनें व गायनाच्या मधुरतेनें काशी-नाथबुवा नि श्रीपादबुवा या पितापुत्र मसूरकर आफळयानी उत्तर

हिंदुस्थानांतही चौथाही सरदेशमुखींचा लाभ कराडच्या कीर्तीबरोबर कीर्तनभक्तीच्या दरबारी सादर करविला. एवढे बरीक खरे कीं या हरिभक्तिपरायणांच्या पठडीत पूर्वरंगाचा फुलोरा मोहरून डवरून निघावयाचा ! आख्यानाला आकाशदिव्याची रम्यता आणि क्वचित प्रसंगीं रोमांचकारी उठाव देण्याची कला श्री. दत्तात्रय वासुदेव उर्फ आबासाहेब धोपाटे यांना साधली असून कविवर्य 'दर्भ' यांच्या सहाय्यानें त्यांनीं बसविलेले 'शिवजन्म' हे आख्यान लक्ष्यांत अढळ राहणारे उदाहरण होय. निरूपणीं कीर्तनात आबासाहेब धोपाट्यांच्या सरळ रेषेनें श्री बळवंत कृष्ण फुटाणे उर्फ सन्त आजकाल भरारी मारीत असूनही हे कीर्तनवांग्मय लोकांना अक्षराधीन होऊन मिळेल तर बहार होईल. ते केव्हां व्हायचे तेव्हां होवो ! पूर्व संस्कारानुसार भगवद्भक्तिपर असलेल्या मनाचे उद्रेक भाषारूप घेऊन प्रगट झालेलेही कऱ्हाडच्या दप्तरीं 'वाचनीय' म्हणूनच आहेत. श्री. महादेव दामोदर कुळकर्णी 'आत्मकथनात'

हरोनि अघ घोर-से मज विशोधिता श्रीधरा ।
मळेल चरणाब्जही भय असे न चित्ती धरा ॥
अनंत तम प्रत्यही करि हरोनि सर्वंसहा ।
समुज्वल करीतसे म्हणुनि का मळे हंस हा ॥

असे मोरोपंती केकेची आठवण देण्याइतके सुंदर अष्टोदर्शी श्लोक लिहितात; तर "धर्माच्या करितां आह्मास जगती रामानि धाडीयले ।" असा जीवनसंदेश प्रतीत झालेले विनायकमहाराज मसूरकर यांचे "आली धर्माची पर्वणी, करा पुत्रांची वर्गणी" असले

सुभाषित बोल तेवढेच उठावानें मराठीच्या मंदिरीं शिवस्वरूप होऊन राहिले आहेत. त्याशिवाय कऱ्हाडकर शिंपी मंडळींपैकीं श्री. मारुतराव नारायणराव कोपर्डे यांचे " बोधामृत " अनेकांच्या स्मरणात आल्याशिवाय राहणार नाहीं. श्रीदत्तभार्गवसंवाद, मारुतीचा ओटा, अमृतानुभवाचे साकी वृत्तांत भाषांतर, गुहेतील गोष्टी हे बाळकृष्ण भाऊ जोशी यांचे ग्रंथ संस्मरणीय आहेत. तथापि संतवाणीचा संथपंथ नव्या काळांतील राष्ट्रीय उद्बोधनालाही चोखाळावा म्हणून अभ्यासपूर्वक वेचे काढून आपल्या टिपण्यासह ते लोकसुलभ करणारांत 'बालगीता' कर्ते भगवंत महादेव कुलकर्णी, ' समर्थ सुभाषित '-कार बाळकृष्ण पांडुरंग कोल्हापुरे, ' मनोबोध ' कर्ते सदाशिव खंडो ऊर्फ आप्पासाहेब आळतेकर आणि महाराष्ट्र भाषाचित्रमयुर आठल्ये यांचीं नांवें कऱ्हाडचे नांव करतात. चित्रमयूर आठल्यांनीं ज्ञानेश्वरीचा गाभा जसा उकलून दाखविला आहे तसाच 'समर्थांचे सामर्थ्य' संवेदनपूर्वक समजाविले आहे. यांच्या भरीला भक्तिविषयक ' स्वतंत्र ' वाङ्मयही मधून मधून उदय पावले नाहीं, असें नाहीं. ज्यांची देवविषयक गाणीं घरोघरीच्या बायका झोपाळयावर नि जात्यावर हौसेनें म्हणत त्या ठकूताई भागवत ऊर्फ ( गो. ग. आगरकरांच्या मातोश्री ) सरस्वतीबाई आगरकर, यांचे वाङ्मय, ' बिल्वदळ ' कर्ते बाळकृष्ण सावळाराम बुधकरांचे ' पहिले हरिभजन ', उद्धव दत्तात्रय कुलकर्णी यांची ' सख्यभक्ति ', गोविंद पांडुरंग देव ( कवि प्रसाद ) यांचे ' लाड ', सौ. इंदिराबाई दिवेकरांचा ' वासुदेव ', सौ. सुलोचनाबाई गोखल्यांचे ' वत्सल आर्जव ' वगैरे काव्यकिरणें भक्तिसाहित्याची परंपरा चालवीत असलेली आढळतील.

याशिवाय नव्या मनूला साजेसा भक्ति वांग्मयाचा टवटवीतपणा चाखावयाचा तर, हा पहा येथें आहेः—

या रे या रे निर्धारक । आपुलाले संशोधक ॥
नलगे परोपकारी कुणी । येथें स्वार्थाच्या साधणी ॥
काशा पढीक पदवीधर । व्हावे जीवन–विजयंधर ॥
ज्ञानज्वानीच्या रे भरी । होइल संसारी चाकरी ॥
वेतन विराम विठ्ठलपदी । बोली रोखीची ही सुधी ॥
जाळा भिक्षेचे डोहळे । हक्का शुद्धीच्या ध्या बळे ॥
अर्जी विश्वेशा मनि लिहा । उत्तर अंतःकरणी पहा ॥

'जननी-जनकज' यांच्या या अभंगाच्या जोडीला 'हृदयनिवासी' (केशव हरि सरडे) यांचाही अभंग न्याहाळाः—

प्रसादाच्या लोभे जनी जनार्दना ।
लाविसी भांडणा पांडुरंगा ॥
उलटी सुलटी चाळवूनि पदें ।
काय तुज साधे पुरुषोत्तमा ॥
तोंड-ओळखही लपवीसी मागें ।
फसवीसी उगे किर्तीकासी ॥
चाळवाया सेवा पाठवूनी कोड ।
लावितोसि होड कासयासी ॥
आम्हापाशी आहे एक दृढ भाव ।
नाशावया माव सकळही ॥
देवा 'जैशा तैसा' हृदयनिवासी ।
कळे का न तुजशी धरी धीर ॥

या अभंगाप्रमाणेंच श्री. बळवंतराव वळवडे यांचे अभंगही चित्ताकर्षकच आहेत. हे कबूल केलेच पाहिजे कीं अशी हरि-परायणतादेखील वर्षांकाठीं साडेतीन मुहूर्तावर बाहेर निघणाऱ्या शिलेदारी पगडीपेहरावासारखी आहे. बाकी, सर्वत्र प्रा. दत्तोपंत पोतदारांच्या भाषेंत सांगावयाचे तर मराठींचा 'इंग्रजी अवतारच' आढळतो. नरापासून निसर्गापर्यंत नितांत नवलाईनें नटलेला नि नवोपचारानीं न्याहारी-बहारीसह बोलता चालता केलेला भौतिक पसारा पाहिला, म्हणजे अतिपरिचयामुळें चटकन् नजर कुठे खिळत असेल तर घरगुती गोष्टीवर. 'सासरची पाठवणी', 'माहेरचे मूळ' या महाराष्ट्रभाषाचित्रमयुरांच्या पुस्तकाप्रमाणेंच कवि बाळकृष्ण (बाळकृष्ण वामन घाटे) यांची 'हृदग्याची गाणी' अगदी खेळणपीठाच्या कोपऱ्यापर्यंत महिलांची आवडती आहेत. लोकप्रियतेच्या पिंपळपानाचे हे लेणे सर्वांच्याच कपाळीं नसले तरी "आजकालच्या, या जगताचा, अनुभव आहे ह्याच मुळी । फुलाहुनीही वंद्य कळी ॥" सांगणारे बाहुलीचे लग्न, सूक्ष्म संवेदनांची उज्वल उकलण आपुलकीच्या आदबीनें करणाऱ्या 'पांडुकुमारां' (दत्तात्रय पांडुरंग पाठक) च्या विरह-विहार-विलासी पद्यपंक्ति, आणि समाजाकडे मातृवात्सल्यानें पाहणारे बुध (बा. सा. बुधकर), पितृकर्तव्यानें बघणारे विष्णुसुत (रामचंद्र विष्णु कुलकर्णी), खेळकर पण संशोधक तटस्थतेनें नजर टाकणारे आनंदीरमण (जगन्नाथ वामन हर्षे), व काव्य कुसुमाचे वसंतगडकर दत्तप्रसन्न कारखाननीस यांच्या सामाजिक नि गृह-विषयक कविता रसिकांच्या कौतुकास सदैव पात्र झाल्या आहेत.

या मोडमांडणींत खेडूतांच्या नि शेतकऱ्यांच्या जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न पंडितराव क्षीरसागर व "वरमाय" कर्ते कविवर्य बाळकृष्ण यांनीं केला असून

लुस्कान निगाल ऽ प्वार
तर जिवाला सम्दा घ्वार
धर्माच पेऽर है प्वार

वडिलधाऱ्याचें कामच ह त्ये कनकर राकात्र ॥१॥

अशा अस्सल ओळींची गाठ केव्हां केव्हां कऱ्हाडकर कवितेंत पडते. त्या संसाराच्या सुरेल संगीतांत, मधून मधून "झाल्या होऊ माता-पितरे देशापायिच कान्ता।" असे देशभक्तीचे सूर निघतात; एवढेंच. नव्हे तर, "खरा मराठा, मरतो पठ्ठा, पळभरही हार होवेनी।" असें मनःप्रबोधनही पहावयास सांपडते. या बाबतींत लक्ष्मण लोकरे इंदोलीकर व श्री. दत्तात्रय कालगांवकर यांच्या कवितेला बरेच महत्त्व आहे.

तथापि राष्ट्रीय दृष्ट्या उद्बोधनासाठीं प्रचलित विषयांच्या हाताळणीपेक्षां रोमहर्षण ऐतिहासिक प्रसंगाचा उपयोगच कऱ्हाडच्या साहित्यसेवकांनीं एकंदरीनें अधिक केला आहे. त्याबाबत डे. व्ह. ट्रे. सो. चे बक्षीसदार रा. गोविंदराव भाटे हे प्रमुख उदाहरण होय. ऐतिहासिक कवितांची पावनखिंड करणारे गो. रा. हिंगणेकर यांच्या आठवणीबरोबर "भवानी तलवार" या कवितेमुळें एंजनेर खात्यां-तील नोकरीस मुकलेले इंदोलीकर कृष्णाजी आबाजी गुरुजी यांची आठवण येणें अपरिहार्य आहे. 'सांगे वडिलांची कीर्ति', त्याला या

जगांत कांहींच किंमत नाहीं हें खरे; पण पूर्वजांच्या पराक्रमांचे परिशीलनानें प्रस्तुतांचा आत्मविश्वास दृढावतो आणि परिस्थिति सापेक्षतेनें प्राप्त कर्तव्य स्पष्ट होते. जीवनाच्या ओघांत पत्करलेला व्यवसाय आणि प्रचलित कायद्याच्या मर्यादा सांभाळून उठावाची राष्ट्रीय जागृती करतां येत नाहीं हे कोण नाकबूल करील ? पण हृदयनिवासी 'च्या केसरीप्रसिद्ध सुभाषिताप्रमाणें एवढे तरी खास म्हणवता येते कीं—

" अहा ! ते लोपले सारे ! "

आणि ह्या ह्मणण्याचा ध्वनिध्वनि आपल्या ऐतिहासिक रोमहर्षण प्रसंगावरील काव्यांनीं स्वतः हृदयनिवासी आणि त्यापेक्षांही आनंदीरमण यांनीं आपल्या काव्यप्रपातातून मोठ्या प्रमाणांत साधला आहे. आणि अशा साऱ्या प्रवृत्तिप्रकर्षाचे प्रतिबिंब साहित्यसेवामंडळानें १९२७ व १९३० सालीं प्रसिद्धिलेल्या फुलोरा, स्वातंत्र्यशार्दूल नि शिवपदी या संग्रहातून पडलेले आहे.

कलेकरितां कला नव्हे तर जीवनाकरतांच कला असल्याकारणानें जीवनांत तत्वज्ञानाबरोबर प्रसन्नताही कलेने फुलविली पाहिजे. भोंवताली पसरलेल्या वस्तुस्थितींच्या विषण्णतेतही विरंगुळा यावा म्हणून तत्वज्ञानाची भुलावर देऊन प्रासंगिक प्रसन्नता निर्माण करण्याची कला पंडित सप्रे ( विष्णु गंगाधर ) यांच्या चिमुकल्या नि मिस्किल कवितेनें साधून प्ररूढ काव्यकल्पनांला काय पण विनोददर्पणालाही अर्धचंद्र दिला आहे. पंडित सप्रयांच्या या नव्या पताकेला आपल्या कवितातून नाचविण्याचा प्रयत्न शांताराम आठवल्या

सारख्यानी चालविला आहे. एवढ्या गोष्टीकडे अंगुली निर्देश केला म्हणजे पंडितांच्या अर्धचंद्राची खुलावट अधिकच डोळ्यात भरेल.

प्रतिभावन्ताच्या लेखणीची पहिली कुजबुज कवितेच्या कानाशी होते, हे श्री. गणपतराव आळतेकरांच्या चिरपरिचितांना तरी सांगावयास नको. पण कवि म्हटला की टोपण नावाचे विस्मरणां करून चालणार नाहीं. आपल्या काव्यसंपदेला वहीच्या बाहेर डोकावून न देण्याइतका बादशाही खाक्या आळतेकरासारखेच कोणीतरी सांभाळूं शकतात. बाकीच्याना नावानें प्रसिद्ध होण्यामुळें आपण आपल्या कवितागुणांच्या चिकित्सेला आणि निर्भीड निंदा स्तुतीला आचवू अशी भीति वाटते म्हणून अगर तशी चिकित्सा सहन करण्याची ताकदच नसते म्हणून टोपण नांव घेण्याची बुद्धी होते कारण ‘ काव्या ’ त आविष्काराचा व्यामोह अनावरच होत असतो. पण टोपण नांवे घेताना ती कांहीं वैशिष्टय दर्शक असली तर कांहीं शोभा ! कांहींतरी निरर्थक टोपणनांवे धारण करणारांची केवळ टिंगल, छे ! छे ! व्याकरणप्रक्रीयेने बोलावयाचें तर विडंबन करण्याकरिता, श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले यांनी एक चमत्कारिक टोपणनांव धारण केलें. “ टोपण नांवाच्या हौसेचे ‘ जननीजनकज ’ सारख्या नावानीं विडंबन झाले ” असें श्री. काव्यविहारींच्या स्फूर्तिलहरीना लिहिलेल्या प्रस्तावनेंत श्री. खांडेकरांनींच चक्क कबूल केले आहे. टोपण नांवाचे गोखल्यांनीं केलेले हे विडंबन कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून सर्वांच्या कुतुहलाचा विषय होतो, हे लक्षांत घेतले म्हणजे गोखल्यांच्या “ शिळोप्याच्या शहाणपणानें ” जसे मुंबईच्या प्रफुल्लतेचे रकाने तसेच रसिकांच्या मालांचे कानेकोपरे खुलविले

असतील याची कल्पना येईल. नाट्यछटांच्या बाबतीत श्री गोपाळ कृष्ण व सदाशिव कृष्ण बहुलेकर बन्धु वाचकांची बत्तीशी बाहेर काढावयास कधीच चुकले नाहीत आणि त्यातही सदाशिव कृष्णांचे 'नेपथ्यपाठ' ( कर्टन् लेक्चर्स ) रंगमहालातून 'गालावर टिचकी' मारून वाचले गेल्याचे कित्येकास माहित आहेत. श्री. आनंदारमणांना लिहिलेले "आधुनिक रामचरित" तर उपहास विडंबनात्मक 'प्रदीर्घ लघुकथा' असून विष्णुपुतांची 'मोतीवाला' ही कविता म्हणजे उसन्या कवीचा व्याजोक्त पाणउतारा होय. श्री. सदाशिव दत्तात्रय मोघे यांच्या लघुकथा व लघुनिबंध 'साहित्य बत्तीशी' च्या निशाणाभोवतालची छोटी छोटी पथकनिशाणे आहेत असाच भास कोणाही अभ्यासकास होईल. श्री. शंकर परशराम जोशांची आठवण करून देणारा शंकरराव करंबेळकर यांच्या वाहता विनोद पद्धतशीर-पणें अक्षराविष्ठित होईल तर मराठीचे भूषण म्हणूनच नांदेल. या शिवाय गणेश अप्पाजी माळकर व उद्धव दत्तात्रय कुलकर्णी यांना ते रंगांत आले असता, एकादा 'बॉस्वेल' भेटेल तर विनोदाच्या पिचकाऱ्यानी मराठीची रंगपंचमी सार्थपणें साजरी होईल. आपले विनोद तुषार मराठीच्या प्रांगणातील 'कारंजे' करण्याची योग्यता कऱ्हाडच्या मराठीला येईल तेव्हां येवो, गुलाबदाणीची क्षणिक शिंपण म्हणून कऱ्हाडकरांच्या विनोदाला मराठांत निखालस स्थान आहे. पहा की—

"माझ्या या अधराहूनी अधर ते मोठे किती सान वा ।
ते म्या मोजुनि पाहिले, उगीच का व्हावा तिथे वानवा ॥

– आई, मी करणार नाहिच तसे केव्हां चुकोनी अता ।
दाराआडुनि चोरुनी जन कुणी देखे असे देखता ॥"

असा हा एका अधुनिक 'सरळ पोरीचा' नमुना जसा कऱ्हाडच्या काव्यप्रांती पहावयास सापडतो तसाच, पासष्ट वर्षापूर्वी मराठी शाळेचे हेडमास्तर श्री. लक्ष्मण गणेश जोशी यानी "भाग्यवंत बायको" वर्णिली आहे तीही मनोवेधक वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

"अंगाने म्हैस काळी, वटवट करिता हादरे सर्व माळी ।
दाताच्या उंच फाळी, मळवट भरते दाटसा भव्य भाळी ॥
धुंडी मोठ्या सकाळीं उठुनि तरतरा एकुणीएक चाळी ।
तोंडे मोठ्यात गाळी सतत परिसता त्रासली सर्व आळी ॥

असल्या स्वभाव विशेषांचा सुभाषितवजा गाववार जणु सातारा जिल्ह्याचा भूगोलच शेरेकर नारोपंत कुलकर्णी मास्तरांनी तयार केला आहे. चिमूटभर नमुना असा—

"कानात केस माइणकर । उघडे बोडके मालखेडकर ॥
छान छोके वाईकर । काळे नकटे नरसिंगपूरकर ॥
सैल – सर्जे तांबवेकर । वाट चुके कऱ्हाडकर ॥
मुलखावेगळे शिराळकर । चोरटे उचले उंब्रजकर ॥
पटेल गर्विष्ट कोळेकर । लाडिक बायका पोतलेकर ॥

मनुष्यस्वभावातील छटावर उभार धरलेला हा जसा विनोद, तसाच एका सार्वजनिक स्थितीवरील कटावात (चित्रगुप्त ८ डिसेंबर १८८७) असा वर्षाव आहे कीं,

" राज्य फुकाचे, धनी सुखाचे, नित्य कायदे बहु जुलमाचे ।
व्हिक्टोरीया दयाळु राणी, शंभुची पाहणी, पिकास हानी ॥
शेती रडती, दस्त फिटेना, पोट भरेना, नोटीस झाली कायद्या-
प्रमाणें । हा कामाचे छापिल नमुने । सही करावी कलेक्टरानें ॥"

याच्याही पूर्वी तीन वर्षे इसलामपूरच्या प्रतोदास लिहिलेल्या बातमी-पत्रात ज्याचा आजकाल 'आत्रेय' विनोद म्हणून ज्ञानप्रकाश पाडला जातो. त्याचा नमुना सापडतो तो असा—

" आमचे 'स्वदेशहितजागृत' 'ट्रिब्यून' (दाद लागणारे) विदूषकबुवा आपले काम करतील. त्यांची काळजी कशाला? म्हणून स्वस्थ बसलो. पण उपयोग काय? जंगलीबुवाच ते! आर्यधेनूचा आणि तिच्या स्वहितदक्ष गोपाळांचा तमाशा पाहण्यातच तें गुंग!! शिवाय प्राप्तीवरील कराबद्दल दोन लघुशंका करण्याची त्यास गडबड झालेली! मग गरीबाकडे त्याचे लक्ष कसे जाणार? ते कानावर जानवे ठेवून कच्छमुक्त होऊन बसले."

'जेवढे हसाल तेवढे खुशाल' या न्यायानें वरीलसारख्या विनोदाबरोबर काही प्रासंगिक प्रहसने कऱ्हाडच्या जुन्या वृत्तपत्रांतून चाळली असतां सांपडतात. पण " नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्" या न्यायानें कऱ्हाडकर वांग्मयात न टके रंगली यांत शंकाच नाहीं. शेक्सपीयरच्या हॅम्लेटचा एकमेव लोकप्रिय मराठी अवतार जे 'विकारविलसित' ते गोपाळ गणेश आगरकरांच्या लेखणीचें अपत्य होतें. गंगू, अनुकरणीय स्त्री व बापूची पगडी ही कृष्णाजी आबाजी गुरुजींची नाट्यपुस्तकें जशीं मनोरंजक व उद्-बोधक तशींच संस्मरणीयही आहेत. भारतीय नाटक मंडळीच्या

रंगभूमीवर गाजलेली सिंहगड, चंद्रानना (शूरसेनमालिनी) हीं नाटकें लिहिणारे माधव रामचंद्र पावनगडकर (कालें) यांना विसरणें म्हणजे अभ्यासकानें पेंग घेणेंच ठरेल. त्यानंतर सयाजी विजय मालेचे लेखक श्री. महादेव दामोदर कुलकर्ण्यांचे 'दंभस्फोट' ऊर्फ श्रद्धा-विमोह, श्री. पु. पां. गोखले यांचे श्रीकृष्णगळ्यानें गाजविलेले 'शूरसेन' रा. शिवलिंग रामचंद्र आळटकर यांचे आनंदसंगीत कंपनीनें नटविलेले 'वनविलास,' गोविंद बल्लाळ देवलांच्या पाठीमागे साध्या घरगुती भाषेत लिहून सदैव हृदयस्पर्शी ठरलेले हुबळीकर नारायण विनायक कुलकर्णी यांचे माईसाहेब आणि द. म. सा. सं. चे निमित्तानें होत असलेले नारायण हरी ऊर्फ बबनराव विंगकर यांचें 'बाहुलीचा-संसार' हीं नाटकें जशीं प्रयोगानें चित्ताकर्षक तशीच वाचल्यानें विचारप्रवर्तक ठरली आहेत. ही जशी पौराणिक नि ऐतिहासिक तशीच सामाजिक व राजकीय क्षेत्रांत वावरली आहेत. यांची प्रयोग दुर्मिळतेनें अभागी ठरलेली भावंडे म्हणजे गोखल्यांचे 'स्वार्थ साधन', विंगकरांचे 'कुलांगार' आणि जकातें पेंटरांचे एक नाट्यापत्य! नाटकांच्या नाकावर टिच्चून आजकाल बोलपटांचा बेलभंडारा उठत असतां, वेळोवेळीं प्रयोगशरण होऊन पडणाऱ्या नाटकांची नाकेबंदी लवकर उठेल असे दिसत नाहीं. आणि म्हणूनच नारायणराव कुलकर्ण्यांच्या लेखणीनें 'मायाबाजार' बोलपटासाठीं कसरत केली आणि त्या कसरतीला शंकरराव करंबेळकरांच्या पद्यांनीं साथ दिली, तथापि दिग्दर्शकांच्या धांगडधिंग्यांन त्यांच्या 'पायाची दासी' होण्यास कुणाही लेखणी कबूल नसल्याकारणानें त्या दिशेनें नवीन प्रयत्न झालेला आढळत नाहीं.

'नाटक-शिणेमा' च्या अंगवळणानें तमाशाची नशा डोळ्यावर यावी यात काय आश्चर्य आहे ? या बाबतीत ( नावेच्या ) रेठ्याच्या पठ्ठया बापू कुलकर्ण्यांनी कऱ्हाडचे नांव महाराष्ट्रभर आपल्या लावण्यानी लाडावले हे श्री. गो. गो. अधिकारी यांनी प्रसिद्ध केलेल्या पठ्ठयाबापूंच्या लावण्यांचे पुस्तकावरूनही प्रत्ययास येईल. पण पुस्तकरूप घेण्याचे भाग्य लावण्याला लाभले नाहीं. त्या सवाई पठ्ठयाबापू ( बापूराव लुकतुके ) वाघेरीकर यांच्या लावणीची छक्कड कशी फक्कड झडत असेल याची कल्पना येण्यासाठीं खालील एक घोट घेऊन पहा:—

" धन्य कर्त्यानें करणी केली, तुला निर्मिली,
वाटे सोन्याची मूस ओतली ।
बहु कळा-कुसर दाविली, हातोटि साधिली,
कमी रतिमात्र कुठं नाहि चुकली ग ॥
जरी ठिपक्याचा शालु नेसली, चोळी अंगीं रुतली,
दागदागिन्याची दाटि झाली ।
गगनांत बिजली झमकली, नेत्रेदीपली,
भासे हृदयांत मूर्ति तुझी ठसली ग ॥
काल तिनीसांजा तुला ग पाहिली, गुंग मति झाली,
रात्र वैऱ्याची मला गेली ।
खाण्यापिण्याची शुद्ध नाहि राहिली, काया कोमेली,
विलक्षण जादु तुझ्यामधी कसली ग ॥
चिमण बागेत लिंबे दोन पिकली, पाखरे त्या टपली,
घ्यावि झाकून पदराखालीं ।

किती आवरू आवरेना झाली, नेत्र लं× वनली,
जोराजोरानें करति त्या चाली ग ॥
देवानें गाठ आज पडली, वेळ चांगली,
बोल अधराची गोष्ट पहिली ।
सात मजली हवेलि बांधली, शोभा बहु केली,
दागदागिने अंगावर घाली ग ।
कपिलाषष्ठिची पर्वणी आली, नको पाहु खालीं,
बळे चालून लक्ष्मी आली ।
माझ्यासारखी मूर्ति लाभली, अंबा तुला पावली,
करि नवसाची तिला लाखोली ग ॥
सवाई बापूनें कवनें ही केली, तुऱ्याची शैली,
शक्तिवाल्याची युक्ति हरली ।
गाता गाता चूप राहिली, तोंडे कोमेलि,
पूर्ण साडेसाति त्यांना आली ग ॥ ७ ॥

बहुजनसमाजाचें जीव-लावणी वांग्मय म्हणजे खरोखर लावणीच होय. शाळू-अरगडीच्या अगदी हुरड्यासारखे ते त्याच्या जोडीला मक्याच्या हुरड्यावर जीव तुटून पडावयाचा. वांग्मयाच्या बाबतींत लावणीच्या जोडीला पोवाड्याना तसेंच महत्त्व आहे. पण लावणीचं हलगी वाजवून जसा कऱ्हाडच्या लेखणीनें फड उठवला तस डफावर थाप मारून फड मारल्याचें आढळत नाहीं.

वांग्मयाच्या या देशिकार स्वरूपाकडे लक्ष देण्यासारखा शाहीरी उठाव साधला नाहीं तरी लघुकथांचे नर्मसचीवत्व कऱ्हाडच्या

लेखणीनें पुष्कळच सफाईदार केलें आहे. सोनुकल्या कल्पनांना सोनकळा आणणारे बापूराव बिजुटकर (मे महिन्याच्या सुट्टींत व चंद्रावरील डाग कर्ते) व के. रा. पुरोहित नि श्रीराम वाघमोरे, आपल्या इंग्रजींत वाचनांत आलेल्या कथाकल्पना सफाईनें सजविणारे लक्ष्मण बळवन्त हरोलीकर व रामचंद्र सदाशिव ढवळे, शेतकऱ्याच्या नि कामकऱ्यांच्या दुःस्थिती रेखाटणारे नाथ चव्हाण, बंगाली चारुतेनें आणि रोमहर्षण ऐतिहासिक प्रसंगानी अंतःकरण उचंबळून आल्यामुळें प्रदीर्घ लघुकथा प्रसविणारे आनंदीरमण, समाजातील अद्भुत आणि रम्य दिसेल तेवढे वेचून काढून कथा रंगविणारे पु. पां. गोखले, 'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे' हे सहज दाखविणारे नारायण विनायक कुलकर्णी, यशवंत, सत्यकथांची मौज पुरविणारे डॉ. श्री. म. कुलकर्णी आणि वस्तुस्थितीची चित्रणे मुळास धरून करण्याचा प्रयत्न करणारे स. कृ. बहुलेकर, पांडुरंग नरहर वळवडे व बाळकृष्ण घाटे वगैरे मंडळी लघुकथांची कथा अवश्य स्मरणी ठेवील. लघुतमकथा लिहिण्याची कर्तबगारी पंडित सप्रे यांच्या लेखणीनें सुंदर केलीच आहे पण अनेक प्रसंगाच्या समरस गुंफणीनें समाजातील प्रातिनिधिक आणि सामुदायिक चित्रें रंगविणाऱ्या कादंबरीच्या म्हणजे विविध लघुकथांच्या वैचित्र्यपूर्ण सहचर्याच्या क्षेत्रावर 'फाकडे तलवार बहादर' कार चित्रमयूर कृ. ना. आठल्ये बंगाली वांग्मयातील आणि टॉड हंटरच्या ऐतिहासिक गोष्टींतील अद्भुत रम्य उठाव वाचकांच्या डोळयापुढें आपल्या मराठी कथानकानी खेळविणारे वाईच्या मकरंद मालेचे नामवंत कादंबरीकार जगन्नाथ वामन हर्षे, 'सहकारी कृष्णासारखे' साधे, सोपे नि नेमस्त लिहून

खेडेगावची, गरिबांची आणि गांजलेल्यांची हृदयस्पर्शी चित्रें रेखाटणारे महाराष्ट्र कुटुंब बालाकार नारायणराव कुलकर्णी, शुद्ध-सात्विक-समुद्‌-बोधक वातावरण रेखाटणारे ( रासोल्हास, इनामदारांचा बाळू वगैरेचे कर्ते ) बाळकृष्ण भाऊ जोशी आणि रशियन क्रांतिकारक कादंबऱ्याचा उतारा करणारे केशव रावजी पुरोहित यांचीं नांवें आदरणीय म्हणूनच उल्लेखली जातात.

कल्पितापेक्षां प्रत्यक्षाचा प्रभाव माणसाच्या मनावर आणि नंतर कृतीवर झटकन् होतो. म्हणून आपल्या प्रतिभेचा उपयोग समाजनीती, तर्कशास्त्र व माणुसकी यांच्या समन्वयानें लोकापुढें आदर्श चरित्रें ठेवण्याकडे करण्याचा शिरस्ता आहे. कऱ्हाडऱ्या खातीं हा शिरस्ता धुंडाळू जाता लोकमान्य टिळकांचे पहिले चरित्रकार म्हणून कृष्णाजी आबाजी गुरुजी यांना पहिला मुजरा केल्याशिवाय कोणास राहवेल ? महाराष्ट्रभाषाचित्रमयूरानी लिहिलेले लोकहितवादींचे चरित्र सदाशिव खंडो आळतेकरांनीं भक्तिभावानें लिहिलेले समर्थचरित्र, कोपार्डेकर आण्णाजीराव शिदोजीराव चव्हाणांनीं लिहिलेले डॉ. रवींद्रनाथ टागोरांचे चरित्र आणि पु. पां. गोखले यांनीं लिहिलेले आगरकर चरित्र ही चटकन् डोळ्यापुढें उभी राहतात. " चरित्र लेखनाची कला ही वेगळीच आहे. मार्मिक निरीक्षण, मजबूत स्मरण-शक्ति कलावन्त वर्णनशैली आणि चरित्रनायकाविषयीं अत्यादर ही या कलेची मुख्य साहित्ये होत. ज्या व्यक्तींचे चरित्र लिहावयाचे ती असाधारण पाहिजे हे तर खरेच; पण त्या मृतव्यक्तीला पुन्हां वाचकांच्या नजरेसमोर वावरावयास लावण्याचे कौशल्य लेखकांच्या अंगीं पाहिजे हेही तितकेच खरे " नमुनेदार चरित्रग्रंथांच्या या राइट

ऑनरेबल् अस्क्रिथनी दिलेल्या कसोट्या वरील चरित्रास सर्वथैव लागू पडतात असे कोणीच मानीत नाहीं. पण या कसोट्या पुढें ठेवूनच ह्यांनी घेतलेली चरित्रे लिहिण्याचा प्रयत्न चौघांपैकीं तिघांनीं केला असल्याचा निर्वाळा अनेक पुस्तक परीक्षकांनीं दिला आहे.

आदर्श व्यक्तिचरित्रापेक्षा सर्वसामान्य समाजचरित्र ऊर्फ इतिहास ह्या वाचकांना निकटचा वाटतो. कारण त्यांत सामान्यातून असामान्याचा आदर्श निर्माण झालेला असतो. कऱ्हाडच्या कीर्दींत राजकीय सामाजिक, औद्योगिक, सर्वच बाजूनी एकाद्या कालखंडाचा इतिहास कोणी कोठला लिहिल्याचे नमूद नाहीं. तथापि श्री. श्रीनिवास व्यंकटेश नखाते यांचे ' इस्लामचें क्रांतिकार्य ', ' जागृत सातारा ' या नांवानें प्रसिद्ध झालेला सातारा जिल्ह्याचा ब्रिटिश रियासतीतील गोखलेकृत राजकीय इतिहास, भारत वर्षाचा वेदकालीन शैक्षणिक इतिहास व स्त्रियांचा भारतीय दर्जा हे प्रो. अनंतराव आळतेकर यांचे ग्रंथ, कृ. पां. कुलकर्णी ( ओंडकर ) यांचा भारतवर्षाचा— इतिहास निरीक्षकांच्या डोळ्यापुढें आल्याशिवाय राहाणार नाहींत- पैकी प्राध्यापक कुलकर्णी हे पेशवे दप्तरांचे संशोधक म्हणून सरकार मान्यतेनें आपल्या इतिहास-कोविदतेचा आदर्श समाजापुढें ठेवून बसले आहेत, तर प्राध्यापक अनंतराव आळतेकर ( हिंदु-विश्वविद्यालय काशी ) यांच्या प्रगाढ संशोधनबुद्धीचा बिलोरा शब्दांच्या साच्यात बसविणेही अवघड आहे. कौरवपांडवांच्या भारतीय युद्धा-पूर्वीचा हिंदुस्थानचा इतिहास लिहिणें शक्य आहे, याचे प्रमाणबद्ध विवेचन अनंतरावजीनी कलकत्त्याच्या ऐतिहासिक परिषदेपुढें नुकतेच केले असून पुराण-वेद-ग्रंथांच्या वाचनाला अगदी डोळस व कुशाग्र

वळण लावलें आहे. श्री. गोखले यांनीं " परिचित सातारा " या पुस्तकांत जिल्ह्याचा सामाजिक नि आर्थिक जीवनक्रम रेखाटून, इतिहास संशोधक शंकरराव जोशी यांच्या शब्दांत सांगावयाचे तर, " खेडीं बोलकीं केलीं आहेत. "

चिकित्सेने लिहावयाचे तर निबंधाचे पटाईत कलम हातीं लागते. शोभा, सामर्थ्य आणि संपन्नता या दृष्टीने निबंधांच्या बाबतींत गोपाळ गणेश आगरकर व चित्रमयूर आठल्ये यांची बरोबरी कोण करूं शकेल ? तथापि, ' दासबोध श्रीसमर्थांचाच व लोकमान्यांची धार्मिक मतें ' हे रा. गणपतराव आळतेकरांचे निबंध, रा. बाळकृष्ण वामन धोपाटे यांचा ' विवेकानंदा ' वरील निबंध, तत्त्वज्ञान विषयक लक्ष्मण बळवंत हरोलीकरांचे, कायदेविषयक रा. ना. बा कार्वेकर वकीलांचे, शेती नि शेतकरी हितसंबंधावरील रा. लक्ष्मण महादेव देशपांडे यांचे, यशोलोचनात्मक श्री यशवन्त बळवन्त चव्हाणांचे आणि आगरकरासंबंधीचे पु. पां. गोखले यांचे निबंध, श्री. दत्तात्रय पांडुरंग पाठकांच्या कालिदासावरील, ब.ळकृष्ण पांडुरंग कोल्हापुऱ्यांच्या लैंगिक शिक्षण व संतती नियमनावरील आणि पालीकर श्रीकृष्ण केशव क्षीरसागरांच्या टीका परीक्षणात्मक निबंधाप्रमाणेंच कऱ्हाडला कीर्तीकर ठरले आहेत. गोविंद जयराम फणसळकरांचे ( इंदोलीकर ) शिक्षण विषयक नि पुस्तक परीक्षणात्मक निबंध आणि या सर्वांबरोबर पांडुरंग नरहर वळवडे यांचे शारीरिक शिक्षणावरील निबंध वाचकांच्या मनःचक्षूपुढून कधींच हालणारे नाहींत. आणि श्री. रा. पां. वैशंपायन ( महाराष्ट्र हायस्कूल ) यांचे समाज-राजकारण विषयक निबंध अभ्यासकांच्या कौतुकाचे विषय आहेत.

दैनंदिन जीवनाचा विचार करतां, निबंध लेखनांतील घटाइतीचा उपयोग नियतकालिकांच्या सृष्टीत जेवढा होतो तेवढा दुसरीकडे क्वचित! प्रथम केसरीचे आणि नंतर सुधारकाचे संपादन गोपाळ गणेश आगरकरांनी निबंध लेखनाच्या जोरावर एवढ्या परिणामकारक प्रमाणांत केले कीं महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे उत्तमांग आगरकरांच्या नांवाशिवाय फिके पडेल. बनारस येथें "कालिदास" वृत्तपत्र काढून कृष्णाजी आबाजी गुरुजींनी एवढी कीर्ति केली कीं 'काळागोरा' व 'कानपूर विहीर' या लेखाबद्दल सरकारी पाहुणचार त्यांना भोगावा लागला व प्रपंचाची वाताहत झाली. महाराष्ट्रभाषाचित्रमयूर आठल्यांनीं 'केरळ कोकीळ' एवढ्या यशस्वीपणें चालविलें कीं, ज्ञानकोशकार केतकरांना पूर्वाश्रमी केरळ कोकीळच्या धर्तीवर महाराष्ट्र कोकिळ काढण्याचा मोह अनावर झाला औद्योगिक विषयांना वाहिलेले नागपूरचे उद्यम मासिक उंब्रजकर पाध्यानी किती माहितीपूर्ण चालविले हेही सर्वांच्या परिचयाचे आहेच. 'श्रीशाहू' वर्तमानपत्र सातारा येथें रिसवडकर वामनराव ढवळे यांनीं ४३ वर्षांपूर्वीं काढले व आज विष्णुपंत ढवळे चालवीत आहेत. 'नव्याकाळ'च्या ललित विभागांतील लघुकथाभागाचे संपादक के. रा. पुरोहित नि ज्ञानप्रकाशची "काव्यशास्त्रविनोद" पुरवणी संपादणारे गो. रा. रिंगणेकर यांची नांवें कोण विसरेल? खुद्द कऱ्हाड येथें १८८४ त 'विदूषक' रा. श्रीपतराव जोशी यांनीं, १८८७ त 'चित्रगुप्त' श्री. जगन्नाथ बाळाजी सप्रे यांनीं, १८९६ त 'सुमंत' रा. पांडुरंग बळवंत कोल्हापुरे यांनीं, १९२४ मध्यें

'कैवारी' रा. कळंबे मास्तरांनीं व १९२८ मध्यें 'अभ्युदय' डॉ. नारायण पांडुरंग कोल्हापुरे यांनीं सुरू केलें आणि या सर्व राजकीय नियतकालिकांचे संपादकांनीं आपआपल्यापरी राजकीय जागृतिही केली. यांच्या जोडीस 'पंचानन' हेही एक वृत्तपत्र व १९१२ त विनायक महादेव जोशी यांचें 'कर्तव्य जागृति' मासिक चालू होते. शिवाय केवळ गेल्या तपातच मीर मुनशी भालदार यांचे 'खबरदार', रा. खतीब यांचे 'मुसलमान', रा. महादेव पुंडलिक बिचकर यांचे 'लोंकसेवा' ही वृत्तपत्रे आणि रा. त्रिपट मास्तरांचा 'भाग्योदय', बिचकरांचा 'स्वकुळ-साळी विजय', श्री. स. ब. पाटलांचा 'शिक्षकाचा कैवारी' व श्री. उद्धवराव कुलकर्ण्यांचा 'प्रताप' व दे. आत्माराम पाटलाचे 'लोकक्रांति' ही चमकून अंतर्धान पावलेली मासिके नि नियतकालिके होत. याशिवाय कांहीं काळ कार्वे येथून भारतोत्कर्षमाला रा. अण्णाजी शिदोजी चव्हाणानी चालविली होती. आणि रा. गोविंद पांडुरंग देवांनीं रसिकरंजन माला नि बाळकृष्णपंत घाट्यांनीं साहित्यसेवा माला प्रसिद्ध केल्या होत्या. या सगळ्या संपादकीय संसारांत आणखीही एक गोष्ट सांगून ठेवली पाहिजे कीं काहीं दिवस श्रीशाहूचे गोविंद जयराम फणसळकरांनीं तर पुण्याच्या 'विहारी' नि खानापूरच्या लोकमित्राचे सह-संपादक गणेश गोविंद विजुटकरांनीं आणि पळसगावच्या भाग्योदयाचे डॉ. शकर गणेश जोशी यानी तर उ. द. कुलकर्ण्यानी 'मकरंद'चे सहसंपादकत्व यशस्वीपणें केले होते. आपल्या संपादन कार्यांत सर्व स्थानिक संपादकानी एक व्रत जर कोणते अचूक पाळले असेल तर प्रसिद्धी विन्मुख पण लेखनपटु साहित्यिकांच्या लेखांचे

गुप्त अगर उघड दान मिळवावयाचेच. अशा गुणग्राहक वृत्तीमुळेंच विदूषकानें कृष्णराव देसाई मास्तरांचे राजकीय निबंध, चित्रगुप्तानें रा. बाळासाहेब बेलापुर्‍यांचा विनोद, सुमंतानें रा. महादेव दामोदर कुलकर्णी यांचे व गणपतराव मारुलकर यांचे व्यासंगी लेख नि. पां. भाटे, माणकीकर, घाटे, सरडे, नखाते, गोखले यांच्या अभ्युदयानें प्रसिद्ध पुरुषांच्या यशोलोचनानि सामाजिक व राजकीय निबंध मराठीच्या जामदारखान्यांत समाविष्ट केले.

संपादकांच्या बरोबरीनें वृत्तपत्रांच्या वार्ताहरांचाही विचार होणें साहजिक आहे. कर्‍हाडचें बातमीपत्र नेहमींच ‘ नवखे ’ अगर खळबळ उडविणारे असावयाचे हा जणू सिद्धांतच ठरल्यासारखा झाला आहे. ता. ९ आगस्ट १८८६ च्या प्रतोदात प्रसिद्ध झालेल्या बातमीपत्रांत म्हटलें आहे कीं—

“ येथील गाडीउतारावर असलेली नाव जराग्रस्त झाल्यामुळें तिला पेन्शन देऊन दुसर्‍या तरुण तरुणीची नेमणूक करण्याबद्दल किंवा निदान तिला तरी चांगल्या विद्वान् कारागीर डॉक्टराकडून औषध देण्याबद्दल लोकानी बराच गवगवा केला होता. पण आमच्या उदार प्रभुवर्गाचें तिकडे लक्ष गेले नाहीं....” यावरून रा. दत्तात्रय पांडुरंग पाठकांच्या गद्यकाव्य असणार्‍या निबंधासारखे बातमीपत्रही सजविण्याची प्रथा कर्‍हाडच्या बातमीदारांची फार पूर्वीपासूनची आहे, हे लक्षांत येईल. आणि मग १९२० सालीं कॉंग्रेसनें कौंसिल-बहिष्कार पुकारल्यावर कर्‍हाडच्या सार्वजनिक वाचनालयांत रा. काळे, कानिटकर, कोठारी यांची फजिती उडलेल्या सभेची हकीगत अच्युतराव

कोल्हटकरांच्या संदेशमध्यें रा. ग. गो. बिजुटकर व गणपतराव कोपार्डे यांनीं "कऱ्हाडांत का. का. अँड को." म्हणून कशी दिली अगर ऐक्यांत विनायकराव फणसळकरांनीं 'त्रिशूळ' नांवानें डॉ शं. ग. जोशी यांनीं सातारा-पुणें-मुंबईच्या वृत्तपत्रांतून खळबळ उडविणारीं बातमीपत्रें कशी लिहिली, याचे आश्चर्य वाटणार नाहीं. पण या विशेषापेक्षां, वांग्मयदृष्ट्या कऱ्हाडच्या बातमीदारांचा संस्मरणीय विशेष म्हणजे मोडीशिवाय लघुलेखनाची माहिती नसताही त्यांनी व्याख्यानाचें आदर्श रपोट केले आहेत. उदाहरणादाखलच बोलावयाचे तर गोविंदबुवा आगरकरांचे (चित्रगुप्त ११।७।१८८१) पातंजल योग, रा. पु पां. गोखले यांची (बोलबाला) मध्यें संकलित झालेलीं व्याख्यानें भाई डांगे यांचे आधुनिक समाजशास्त्राचे दिवाळें (लोक-शक्ति ७।१०।३५), भाई शिवरामपंत लेले यांचे मुसोलिनी व स्टॉलिन (त्रिकाळ १४।५।३५), श्री. आत्मारामपंत ओगल्यांचे जपान (त्रिकाळ १९३५), पं. सातवळेकरांचे आर्यधर्मांतील स्पिरिच्युअल कम्युनिझम, ग्वाल्हेरच्या विष्णुशास्त्री पंडितांचे रामायणकाल (१९३८) व दे. बाळासाहेब खेरांचे टिळक हायस्कूलमधील "शिक्षण सेवा त्याग" (अभ्युदय ३१।१०।३७) ही व्याख्यानें बिनदिक्कत कोणाही परीक्षकापुढें मांडता येतील. या कामीं विठ्ठलराव कुलकर्णी आणि वासुनाना देशपांडे अशी मातबर माणसें प्रभावी ठरली आहेत. आतां तर लघुलिपीप्रवीण बाळासाहेब विद्रेकर, बाळासाहेब मोघे अशी माणसे या कामाला वाहिलेलीं आहेत आणि वृत्तपत्र लेखकांचा संघ स्थापून ती संघटित होतही आहेत. तेव्हां त्यांना उज्वळ भविष्यकाळ आपल्या व्यवसायांत खासच निर्माण करतां येणार नाहीं काय?

कऱ्हाडी साहित्याचें सिंहावलोकन करतांना, शेवटीं एकच गोष्ट ध्यानांत येतें कीं, मराठी साहित्याच्या अभ्यास-साधनालाही कऱ्हाडच्या लेखणीनें हातभार लाविला आहे. महाराष्ट्रशब्दकोशाच्या रचनेंत कऱ्हाडच्या साहित्यसेवा मंडळातर्फे रा. पु. पां. गोखले, व (स्त्रियांचे शब्द पुरवून) सौ. सुलोचनाबाई गोखले नि विशेषतः सौ. इंदिराबाई दिवेकर यांनीं हजारो शब्द पुरवून भाग घेतला; आणि म्हणींच्या कोशासंबंधातही तो क्रम कांहीं काळ चालू होता. याशिवाय, लिपी सुधारणेच्या कामीं रा. पु. पां. गोखले धडपडले व अजागळ अनुस्वारांच्या उच्चाटनासाठीं वर्षानुवर्ष चिकाटीनें सशास्त्र खटपट करून किवळकर गोविंद पांडुरंग पावशे यांनीं महाराष्ट्र साहित्य सम्मेलनास शुद्धलेखन समिती नेमावयास लावून अर्धेअधिक यश मिळविलें. रा. भगवंत महादेव कुलकर्णी यांनीं "भाषासुधा" हें पुस्तक लिहून ललित वाङ्मयाच्या अभ्यासाची तोंडओळख करून दिली तर निबंध लेखनाचे दिग्दर्शन रा. गो. ज. फणसळकरांनीं केले आहे. मराठी भाषेचा उद्धार व विकासकर्ते प्राध्यापक कृ. पां. कुलकर्णी यांचा व्याकरण व्युत्पत्तिशास्त्रावरील अधिकार प्रमाणभूत मानण्यांत येतो.

वाचक मित्रहो, कऱ्हाड म्हटल्याबरोबर जे वाङ्मयाचे ब्रह्मांड आठवते त्याचे स्वरूप सारांश रूपानें हे असे आहे.

# कऱ्हाड.

१ प्राचीन अवशेष असलेलें, २ पुरातन काळीं जिल्ह्याचें ठिकाण, ३ कुंभारली घाटांतून कोंकणांत पाटणच्या बाजूनें उतरण्याचा एक टप्पा, ४ पुणें—बेळगांवचा मध्य उतार, ५ कृष्णाराई होन—(१३०० ते १४०० इ. अखेर), करहटक—भरूतचे लेखांत, करहाकडक—कुड्याचें लेण्यांत (इ. सनापूर्वी २०० वर्षे), करहाकड—कानडी राजवंश, करहाटक— करहाट— करहाड— करहड— करहेच्या कांटची दरी, सपाट मुलुख. गरूड, हाटकेश्वर, भैरव, गणेश नाग, कमळेश्वर, नृसिंह, मार्कंडेय हीं कऱ्हाडचीं अष्ट तीर्थे होत. २५० ते ३०४—विजयसेन, ३ रा दामजयश्री, २ रा रुद्रसेन, विश्वसिंह, भर्तृदायज, विश्वसेन या महाक्षत्रपांचीं नाणीं सापडलीं. ५०० ते ६०० माधव वर्म्याचा अंमल. ७९३ राष्ट्रकूटांचा दुसरा दंतिदुर्ग—सामनगडाच्या ताम्रपटांत कऱ्हाड. ८१० राष्ट्रकूटांच्या तिसऱ्या गोविंदानें व्यासभट्टास दान दिलें व तेथपासून " कऱ्हाडे ब्राम्हण " हा शब्दप्रयोग अस्तित्वांत आला. ९०० चालुक्यांचा अंमल. १०५९ मारसिंह शिलाहार ऊर्फ गोंकन ऊर्फ अंककार ऊर्फ गुहेयनसिंग यांचे राज्य. याचीच मुलगी चंद्रलेखा. चंद्रलेखेचें स्वयंवर चालुक्य शककर्ता सम्राट. सहावा विक्रमादित्य यांजबरोबर कऱ्हाडास. (काश्मिरी पंडित विद्यापति बिल्हण याचे वर्णन वाचा.) चंद्रलेखा — चंदलदेवी. १ करहाटपतीची पुत्री, २ विद्याधर कुमारी, ३ विद्याधर राजकन्या, ४ चंद्रलेखेसारखी शोभा असलेली, ५ बिम्बोष्ठी, ६ गौर्यांगी, ७ कुरंगशावाक्षी. ८ स्तनभारोन्नती, ९ विस्तीर्ण चक्षु, १० उत्सारितभुजा

११ कामेन पूर्णाप्यबोधाधोमुखी कृशनासिका, १२ स्मितमुखी, १३ लीलारसांची परिपाक-भूमी, १४ कांतिनें चंद्र दरिद्री.

**विक्रमादित्य** – १ कर्णाट पृथ्वीपति, २ चालुक्यू भूपाक कुळप्रदीप, ३ कुंतल कामदेव, ४ कुंतल चक्रवर्ती.

**राजे स्वयंवरास**– कालिंजर भूधर, मालवेंद्र, गुर्जरेन्दु, प्रकामोन्नत चारुदेह, पांड्य, चोल महिपति सोमेश्वर, काश्मिरचा हर्ष, वेन, राजतरंगिणी.

**११२९ समन्तभद्र** – " बहुभट, विद्योत्कट व संकट " अशा कऱ्हाडास माळवा, सिंधु, पंजाब, काशी करून वादासाठीं अजिक्य पत्रासाठीं आला.

११५४ नरसिंह भट सत्यवादी – विक्रमादित्य शिलाहारानें संगमेश्वर इनाम दिला.

११६५ शिव व सिंधुनदी यांचेपासून झालेल्या व नाग राजानें वाघिणीच्या दुधावर पोसलेल्या सिंध राजानें चार हजार गांवें व शहरें असलेला करहाटक प्रांत - कऱ्हाड - बाहुबलावर पैदा केला.

११९० एडेनाडांतील कोपरवाड गांवांत आपल्या राजाच्या वृध्द्यार्थ पन्हाळ्याच्या दुसऱ्या भोज राजानें आदित्यभट, लक्ष्मीधरभट व प्रभाकर घैसास यांस एक घर, शेत व खडकत्तलक अमृतेश्वरमूर्ती उमामहेश्वर-देवांच्या पंचोपचार पूजेसाठीं दिलें.

१३९६ ते १४०७ च्या दुर्गा देवीच्या दुष्काळापासून दादो नरसो काळे यानें बेदरच्या राजापासून कौल घेऊन १४२६ त वस्ती करीपर्यंत कऱ्हाड उजाड होतें.

१५७३ म्हणजेच हिजरी सन ९८० यासालीं ३० फूट उंच व २५० फूट लांब असा इदगा शाह अली अदिलशहाचे कारकीर्दींत लक्ष्मीचें जुनें देऊळ फोडून उभारण्यांत आला.

१६२० करडेपीर ऊर्फ फरीद तुमर याची बहीण बिबी दुल्हन हिचा वंशज शेख अहमद व॥ शेख फरीद यांस मुजावरकीची सनद मिळाली.

१६६१ इदग्याजवळ मोरोपंत पिंगळ्यांचा अली अदिलशहाच्या सैन्याशी सामना.

१६९५ औरंगझेबाचे ताब्यांत.

१७१७ मोंगल अंमलदार पहदुल्लाखान यास बाळाजी विश्वनाथानें घालविले.

१७३४ नृसिंह देवालय – अनगळ गोसाव्यांनीं बांधलें. त्र्यंबकेश्वराचे देऊळ – त्र्यंबकदि॥ उमरागीर्नीं बांधलें. पूजानैवेद्यास लाटकरांस खाजगी उत्पन्न दिले आहे.

१८१८ दुसरे बाजीराव पळ काढीत असतां ता. २३ जानेवारी रोजीं मुक्कामास.

१८२० चावडीजवळील ( ख्वाजा खिजरच्या दर्ग्याजवळ असलेले ) म्हणजेच आज १९४१ सालीं कोटाखालीं असलेल्या गणपतीस परशुराम श्रीनिवास प्रतिनिधींनी मलकापूरकडील जमीन इनाम दिली.

१८८० कोटाखालील गणपतीचें देऊळ पुरें झालें.

१८८९ पंतांची कचेरी कऱ्हाडहून कुंडल येथें हालली.
(२) बस्तीचे देवळास प्रारंभ.

# ॥ करहाटक-महात्म्य ॥

## अध्याय १ ला.

मध्यदेशे महाक्षेत्रं नाम्ना श्रीकरहाटकं ।
यत्र श्रीकृष्णवेण्यायाः ककुद्मत्यास्ति संगमः ॥ १७ ॥
तादृशः संगमः पक्षिन् नास्ति भूमंडले क्वचित् ।
यत्रोत्तरा महालक्ष्मी ब्रह्मविद्भिः सुसेविता ॥ १८ ॥
वर्तते पीठमध्यस्था देवी सर्वार्थदा नृणां ।
साध्वष्टगुणसम्राज्ञी सायुधा स्वगणैर्वृता ॥ १९ ॥
सिद्धचारणगंधर्वैर्मुनिभिर्वेदवादिभिः ।
प्रत्यहं सेव्यते देवी भुक्तिमुक्ति-फलप्रदा ॥ २० ॥
गरुडः प्राप नगरं लक्ष्मीदक्षिणहस्तजं ॥ ४१ ॥
साम्राज्यहेमवलयं रत्नसानुविराजितं ।
रथ्या चत्वर रम्येतद्धेमसौध-विराजितं ॥ ४२ ॥
अग्निहोत्रार्चनासक्तैर्देवपूजापरायणैः ।
वेदाध्ययनसक्तैश्च प्राप्तातिथिविपूजकैः ॥ ४३ ॥
ऋग्यजुःसामपाठेन पवित्रीकृतमानसैः ।
ब्रह्मचारी-वनस्थानां यतीनां पूजने रतैः ॥ ४४ ॥
एतादृशैर्मुनिवरैः पूरितं पावनं परं ।
तथा युद्धेषु कुशलैः प्रजापालनतत्परैः ॥ ४५ ॥
षष्ठांशभोजिभिः कान्तैर्देवब्राह्मणपूजकैः ।
वेदाध्ययनशीलैश्च तथा याजनतत्परैः ॥ ४६ ॥

देव्याराधनशीलैश्च पूरितं क्षत्रबंधुभिः ।
तथा कुशीदवार्तासु चतुरैर्मितभाषिभिः ॥ ४७ ॥
लक्ष्मीसेवापरैः शान्तैर्वैश्यसंघैः सुपूरितं ।
वर्णत्रयस्य शुश्रूषापरैः शूद्रगणैर्वृतं ॥ ४८ ॥
एतादृशं सुनगरं देवीपीठोपरिस्थितं ।
तन्मध्ये मणिभूषाभिर्भूषितानेक-दिङ्मुखं ॥ ४९ ॥
सुरत्नरचिताभित्ति–दीप्तिजालसमाश्रिता ।
यस्मिन् रत्नमयास्तंभाः मंडपेषु विराजिताः ॥ ५० ॥
द्वारस्तु रत्नसभ्राजत् कपाटा यत्र संस्थिताः ।
रत्नसौधं सकलश संराजद्देवतागृहम् ॥ ५१ ॥
प्रभया यत्र तत्रस्था प्राणिनो मोहमागताः ।
दिनं नक्तं च नाविन्नमरा इव सुप्रभाः ॥ ५२ ॥
तस्मिन् रत्नमयी मूर्तिः कमलायाः सुमस्थिता ।
देवी कनकवर्णा–भा भुजैः षोडशैर्युता ॥ ५३ ॥
महालक्ष्मी महामाया आदिशक्तिः परा स्वयं ।
भव–विष्णु–विरिंच्याद्यैरमरैः परिपूरिता ॥ ५४ ॥
पीठमध्ये जगन्माता भक्तानां वरदा स्थिता ।
तस्या वामे महादेवी रेणुका भक्तवत्सला ॥ ५५ ॥
द्विभुजा वसते पीठे वामकोणे हरोन्मुखी ।
वरदा सर्व जन्तुनां प्राप्ते कलियुगे स्थिता ॥ ५६ ॥
तथा पुरो महादेवी साक्षान्महिषमर्दिनी ।
सायुधा प्राङ्मुखी पूज्या पीठप्राक्कोणगा प्रिये ॥ ५७ ॥

भक्तानां वरदा चण्डी ईश्वरी सिंहवाहना ।
ततो दक्षिणभागेऽपि दुरितस्यापहारिणी ॥ ५८ ॥
देवी रत्नमयी रामा वरदा प्रकृतानना ।
पीठदाक्षिणकोणस्य रक्षणार्थं स्थिता प्रियं ॥ ५९ ॥
देवी वायव्यदेशेच पतगेन विनिर्मितं ।
स्थूलं गृहं प्रयत्नेन कांचनस्तंभमंडितं ॥ ६१ ॥
" तीर्थं चापि भवेत् पवित्रितमिदं मन्नामकं मुक्तिदं ।
स्नातानां सुरपूर्णगर्भगृहमित्याख्यायुतं कल्पतः " ॥ ७६ ॥
तथेत्युक्त्वामराः सर्वे शिव–विष्णु–पुरोगमाः ।
स्थिता तस्मिन् गृहे स्वांशैर्गरुडो विष्णुवाहनः ॥ ७७ ॥
अतो वरप्रदानेन सुराणां क्षेत्रपुण्यतः ।
तदाप्रभृति तत्क्षेत्रं तार्क्ष्यगर्भगृहं प्रभो ॥ ७८॥
जातं सन्मुक्तिजनकं चाश्वमेधफलप्रदं ॥ ७९ ॥

## अध्याय २ रा.

तदग्रे हाटकेशस्य पुण्यं तीर्थमुदाहरत् ॥ १ ॥
हाटकेशं कृष्णातीरनिवासिनं ॥ ९ ॥
स्नात्वा ककुद्मतीसंगे प्रीत्या कर्त्रीविवर्जिते ।
सखीसमागमो यद्वत् संमुखं प्रीतिसंभवः ॥ १० ॥
तथा ककुद्मतीसंगः कृष्णया प्रीतिसंगमः ।
तत्र स्नातो नरः कृष्णाप्रीतिमाप्नोत्यसंशयम् ॥ ११ ॥
कर्त्रीसंगे नरः स्नात्वा पापक्लेशात्स मुच्यते ।
प्रीतिसंगे तु यः स्नाति तस्य पापं पुण्यतामियात् ॥ १२ ॥

अयस्कान्तस्य संसर्गाल्लोहं भवति काञ्चनम् ।
प्रीतिसंगजलस्पर्शात् तद्वत् पापानि पुण्यतां ॥ १३ ॥
कृष्णा भक्तजनप्रतापशमनी माता महामङ्गला ।
श्रीविष्णोरमराधिपस्य सुतनुः संसारचिच्छक्तिदा ॥
तत्संगं कमलासनस्य च हरेस्तन्वोर्जलाकारयोः ।
पश्यन् हाटकनायकः सुरवरः श्रीशंकरस्तिष्ठति ॥ ६४ ॥
सेव्यः क्षेत्रपतिः प्रभात्र-नमितानेकप्रतापे विभुः ।
श्वताश्वन दिवा, निश विवचिनो भ्रांतिकृता हिंसकः ॥ ६५ ॥
दण्डेनाक्रमयन् समस्तदुरितं सद्भक्तचिन्तास्थितो ।
याम्येशं दमयन् विभाति निकटे श्रीभैरवः सौख्यदः ॥ ६६ ॥
गजेंद्राननः क्षेत्रविघ्नापहारी विशालोदरो दंतवक्रः प्रतापी ।
शिवादेहजः सेव्यमानो मुनींद्रैः सुरेंद्रादि सिद्धिप्रदो भाति देवः ॥६७
मेघश्यामः पीतकौशेयवासः ।
श्रीवत्सांकः पुंडरीकायताक्षः ॥
लक्ष्म्या वामे भूषितः .... .... धन्वा स विष्णुः ॥ ६८ ॥
शेषो गौरवपुः सहस्रवदनः श्यामाम्बरः कुंडली ।
देवश्री हलधृक् तथा मुशलधृक् संस्तूयमानोऽमरैः ॥
भूगोलं सनगं सशैलजलधिं स्वीये फणाग्रे दधन् ।
देवं विष्णुमजं हरं स्ववपुषा बिभ्राण आस्तेऽत्र हि ॥ ६९ ॥
विनतातनयः प्रतापवानरुणाम्बरजोऽहिसुदरः ।
अमराधिपसूनुवाहनः खग आस्ते तप आस्थितः किल ॥ ७० ॥
सीतावियोगात्तसुखैकराशिं दुःखैकराशिं परिहर्तुकामः ।
रामः समीपे सहलक्ष्मणोऽत्र सेवापरो यो दुरिताम्बिकायाः ॥७१॥

महिषासुर एष दैत्यराट् भगवत्या परिमर्दितासुरेश्वरः ।
प्रतापी वरदासुलब्धपूजनः सन्निधौ तिष्ठत्यमरत्वमास्थितः ॥ ७२ ॥
अमराधिप-पूजितः सुरेशः सगणो सौमणिसंभवः सुरेशः ।
अतिपिंगटमस्तकजटावानुदयस्याभिमुखरवेर्विभाति ॥ ७३ ॥
अतिताम्रशशाक्ष एष वन्हेर्दिशमास्थाय विभाति वन्हिरिव ।
अनलेश्वर-नाम स महेशः प्रतिभया कपिलेन वर्णितः ॥ ७४ ॥

## अध्याय ३ रा.

कृष्णा-ककुद्मतीसंगे पुण्यातिशयकारिके ।
स्नात्वात्र कमलां दृष्ट्वा नरः प्रथतमानसः ॥ ८ ॥
अश्वमेधस्य यज्ञस्य फलमाप्नोति वै सुकृत् ।
यत्र स्थिता जनाः सर्वे पुनर्भवविवर्जितः ॥ ९ ॥
तस्मात्तु हाटकं लिंगं बभूव कमलाभिधं ।
ईश्वरस्य पुरो देव आग्नेयामग्निनायकः ॥ ६५ ॥
याम्यामैतेश्वरो देवो नैऋत्यां निऋतेश्वरः ।
वारुण्यां वरुणेशो वै वायव्यां मारुतेश्वरः ॥ ६६ ॥
उत्तरस्यां तु सोमेशईशान्यामीशनायकः ।
ईशान-पूर्वयोर्मध्ये कपिलेश उदारतः ॥ ६७ ॥
इंद्र आग्नययोर्मध्ये गोलेशः परिसंस्थितः ।
अनलेश्वरनामा च आग्नेयां दिशि सस्थितः ॥ ६८ ॥

## अध्याय ४ था.

ततोऽन्यद्भैरवं तीर्थं पुरतः पापनाशनं ।
महापातकयुक्तोऽपि स्नात्वा भैरवतीर्थके ॥ १ ॥
पापबन्धाद्विमुच्येत नात्र कार्या विचारणा ॥ २ ॥

## अध्याय ५ वा.

नागानां परमालयं धवलितं तीर्थं महापुण्यदं ।
सेव्यं सद्भिरनुत्तमं सुखकरं श्रीहाटकोपस्थितं ॥
पापौघस्य विनाशनं परतरं विद्यापदं श्रीपदं ॥ ३ ॥

## अध्याय ६ वा.

ततः परं गणेशस्य तीर्थं श्रीकरहाटके ॥ १ ॥
सर्वविघ्नविनाशार्थं गणेशस्तत्रसंस्थितः ॥ २ ॥

## अध्याय ७ वा.

यस्मात् साक्षान्नृसिंहोऽत्र स्नात्वा सौमत्वमागतः ।
अतो नृसिंहतीर्थं वै सर्व पापप्रणाशनं ॥ १०२ ॥

## अध्याय ८ वा.

मुकुंदकृत लक्ष्मीस्तवन.

एहि एहि भक्तजनमानसकामधेनो ।
दिव्यांबुजाक्ष ललिते हृदयांबुजे मे ॥
कामादिषाड्रिपुविनाशनहेतुभूते ।
त्वां चिंतयामि सततं परिमुक्तयेऽहं ॥ ११ ॥
पद्मासने शिव–विरंचि–हरिप्रियादि–
भेदैरनेकगतपूजितविग्रहेऽम्बे ॥
तत्त्वं पदार्थपरिशोधितलक्ष्यवृत्ति
विद्योत्तमान् सुदयासनमाश्रयस्त्वम् ॥ १२ ॥
विद्योत्तमाननचंद्रवृतांगुलीभि–
रासक्तबुद्धि–कविभावित पादयुग्मम् ।

संक्षालयामि ललिते विमलाम्बुजं ते
संभावयामि नवनीतगतिं च तस्य ॥ १३ ॥

अम्ब त्वदंगुलिभूषणरत्नभाभि–
श्चित्रैर्जलैर्विविधरत्नफलैः सुपुष्पैः ।
रक्ताक्षतैश्च सहितं प्रददामि तुभ्य
मर्घ्यं त्वनर्घ्य गुणनीरयसे स्वहृद्भिः ॥ १४ ॥

हेम्नश्च चूडं मणिबन्धभूषण–
माकर्पुरं स्वांगदसंयुतं च ॥ २५ ॥

सत्कंठसूत्रं मणिभिर्विराजित्
एकावली मौक्तिकहारमाला ।
ताडंकयुग्मं मणिमौक्तिकाढ्यं
मुक्तायुतश्चो श्चोपरि वालुकास्ते ॥ २६ ॥

केशाद्विपक्षांतरगं च सूत्रं
मुक्तायुतं भालगतश्च चंद्रः ।
नासाग्रमुक्तामणिहेमयुक्ता
रत्नानुविद्धा मणिमेखला च ॥ २७ ॥

सद्रत्नपूर्णांगुलिभाविता तां
नासाग्रमिश्रांकितरत्नभूषां ।
सद्ब्रह्मसूत्रं नवतंतुयुक्तं
चिद्ग्रंथितं देवि गृहाण भक्त्या ॥ २८ ॥

मार्कंडेयमुनिश्चचार विपुलं कृष्णातटे संस्थितः ।
पौराणाः कथयन् कथा समुदितो देव्याः समीपोऽस्थितः ॥
तत्तीर्थं विमलं धनुःशतमितं कृष्णातटे संस्थितं ।
ये सेवन्ति च वर्णयन्ति मनुजास्ते मुक्तिभाजः खलु ॥ ५३ ॥

( केऽपि सुश्लोकाः करहाटक महात्म्यात् )



# श्री. पु. पां. गोखलेकृत–

| | |
|---|---|
| अठराश्लोकी गीता<br>[ मराठी-हिंदी-संस्कृत-इंग्रजी ] | ३ आणे |
| एकाध्यायी गीता<br>[ मराठी-हिंदी-संस्कृत-इंग्रजी ] | ५ आणे |
| गीताधर्मप्रवेश | ८ आणे |
| परिचित सातारा | ५ आणे |
| सातारा क्रीयापदें | ३ आणे |
| बोल–बाला | ८ आणे |
| दिलके बोल | ७ आणे |
| शुभमंगल सावधान | २ आणे |
| मुंजा मुलास | १ आणा |
| साहित्यिक कऱ्हाड | ८ आणे |
| जागृत सातारा | १ रु. |
| कर्मयोगी सोमण | ४ आणे |
| आगरकरांशीं ओळख | ५ रु. |
| राष्ट्रभाषामें आगरकर | ५ आणे |
| मराठी ईशावास्य | १ आणा |
| आगरकर चरित्र | ८ आणे |

---

मुद्रक— **काशिनाथ रामचंद्र नावडीकर,** श्रीदत्त प्रेस, कराड.

प्रकाशक— **सौ. सुलोचनाबाई गोखले,** सोमवार पेठ, कराड.